७० वर्ष

दैनिक

# संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. २१ मार्च २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०८५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## व्यवसायात गुंतवणुकीच्या आमिषाने २ कोटींची फसवणूक

पुणे (दै. संध्या) : पुण्यात बाटलीबंद पाणी व्यवसायात गुंतवणुकीचे आमिष दाखवून एका पेट्रोल पंप व्यावसायिकाची २ कोटी ३४ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत हडपसर परिसरातील हांडेवाडी येथे राहणाऱ्या एका व्यावसायिकाने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपी हे हडपसर भागातील रहिवासी असून त्यांचे वस्त्रदालन आहे. आरोपी आणि फिर्यादी व्यावसायिक एकमेकांच्या ओळखीचे होते. आरोपींनी फिर्यादीला बाटलीबंद शुद्ध पाणी विक्री व्यवसायात गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळेल, असे आमिष दाखवले. यानुसार, १७ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांच्यात भागीदारी करार झाला. या व्यवसायात गुंतवणुकीच्या नावाखाली फिर्यादीकडून १ कोटी ७८ लाख ७५ हजार रुपये घेण्यात आले. जून ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत बाटलीबंद पाणी विक्री व्यवसायातून मिळालेले ५५ लाख ४८ हजार रुपये आरोपींनी स्वतःच्या बँक खात्यात जमा करून घेतले.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## प्रीमियम पेट्रोल ₹2.35 प्रति लिटरपर्यंत महागले

मुंबई (दै. संध्या) : सरकारी तेल कंपन्यांनी (OMCs) स्पीड आणि पॉवरसारख्या प्रीमियम पेट्रोलच्या किमती शुक्रवारी ₹2.09-₹2.35 प्रति लिटरपर्यंत वाढवल्या आहेत. अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने ही वाढ करण्यात आली आहे. ही वाढ वेगवेगळ्या राज्यांमध्ये आणि शहरांमध्ये वेगवेगळी असू शकते. प्रीमियम पेट्रोलच्या वाढलेल्या किमती तात्काळ प्रभावाने लागू झाल्याचे मानले जात आहे. प्रीमियम पेट्रोल BPCL चे स्पीड, HPCL चे पॉवर आणि IOCL चे XP95 या नावाने विकले जाते. तर सामान्य पेट्रोल जुन्या दरानेच मिळत राहील. सध्या त्यांच्या दरांमध्ये कोणताही बदल झालेला नाही.

## झोमॅटोवरून जेवण मागवणे महाग झाले

मुंबई (दै. संध्या) : फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्म झोमॅटोवरून जेवण ऑर्डर करणे आता महाग झाले आहे. कंपनीने शुक्रवारपासून ऑर्डरवरील प्लॅटफॉर्म फीमध्ये 19% वाढ केली आहे. युजर्सना प्रत्येक ऑर्डरवर ₹12.50 ऐवजी आता ₹14.90 म्हणजेच ₹2.40 जास्त प्लॅटफॉर्म फी द्यावी लागेल. GST जोडल्यानंतर ही रक्कम आणखी वाढेल. प्लॅटफॉर्म फी हे प्रत्येक फूड ऑर्डरवर लागू होणारे अतिरिक्त शुल्क आहे. हे GST, रेस्टॉरंट शुल्क आणि डिलिव्हरी फीपेक्षा वेगळे आहे. झोमॅटो प्लॅटफॉर्म दररोज 20 ते 25 लाख ऑर्डर डिलिव्हर करतो. झोमॅटोची मुख्य प्रतिस्पर्धी कंपनी स्विगी सध्या करांसह सुमारे ₹14.99 प्लॅटफॉर्म फी आकारत आहे. सामान्यतः असे दिसून आले आहे की, जेव्हा या दोन्हीपैकी कोणतीही एक कंपनी फी वाढवते, तेव्हा दुसरी कंपनी देखील लवकरच आपले दर वाढवते.

## अनिल अंबानी CBI मुख्यालयात

मुंबई (दै. संध्या) : रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेड म्हणजेच RCOM शी संबंधित 2,929 कोटी रुपयांच्या बँक फसवणूक प्रकरणात अनिल अंबानी शुक्रवारी (20 मार्च) दुसऱ्या दिवशीच्या चौकशीसाठी दिल्लीतील CBI मुख्यालयात पोहोचले आहेत. यापूर्वी गुरुवारीही तपास अधिकाऱ्यांनी त्यांची सुमारे 8 तास चौकशी केली होती. ही संपूर्ण कारवाई SBI च्या तक्रारीवरून दाखल केलेल्या FIR च्या आधारे केली जात आहे. CBI ने रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेड, अनिल अंबानी आणि काही अज्ञात लोकसेवकांविरुद्ध हा फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाची सुरुवात 18 ऑगस्ट 2025 रोजी SBI च्या तक्रारीने झाली होती. SBI त्या बँकांच्या समूहाचे म्हणजेच कन्सोर्टियमचे नेतृत्व करत आहे, ज्यांनी कंपनीला कर्ज दिले होते. या समूहात बँक ऑफ इंडिया, युनियन बँक, कॅनरा बँक आणि IDBI सारख्या मोठ्या नावांचा समावेश आहे. तपास यंत्रणेनुसार, या प्रकरणाचा आधार एक फॉरेन्सिक ऑडिट अहवाल आहे. अहवालात आरोप करण्यात आला आहे की, 2013 ते 2017 या वर्षांदरम्यान कर्जाच्या रकमेचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर करण्यात आला.

# राजीनामा द्या : मुख्यमंत्र्यांचा रुपाली चाकणकरांना आदेश

मुंबई (दै. संध्या)



बलात्कार, महिलांचे लैंगिक शोषण, महिलांची फसवणूक अशा गंभीर आरोपांमध्ये भोंदू बाबा आणि स्वयंघोषीत कॅप्टन अशोक खरात याला अटक झाली आहे. अशोक खरातसोबत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांचे व्हिडीओ आणि फोटो समोर आले आहेत. अशोक खरातचे पाय धुतानाचे तसेच त्याच्या सोबत कार्यक्रमस्थळी वावरत असतानाचे रुपाली चाकणकर यांचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होत आहेत. हे व्हायरल होत असताना चाकणकरांनी राज्याच्या पोलीस महासंचालकांची भेट घेतली आहे. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रुपाली चाकणकर यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचा आदेश दिला आहे. पोलिसांनी संपूर्ण प्रकरणाची निःपक्षपाती चौकशी करावी अशी मागणी रुपाली चाकणकर यांनी केली आहे. तर पोलीस कारवाई निःपक्षपाती व्हावी यासाठी रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा ताबडतोब राजीनामा द्यावा, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या आदेशामुळे रुपाली चाकणकर यांच्या अडचणीत वाढ झाल्याची चर्चा आहे.

राजकारण्यांना स्वप्न दाखवणाऱ्या तथाकथित ज्योतिषी आणि अंकशास्त्रज्ञ अशोक खरात याला बलात्काराच्या गंभीर आरोपात अटक करण्यात आली आहे. स्वत:कडे दैवी शक्ती असल्याचा दावा करणाऱ्या भोंदू अशोक खरातचे एकूण ५८ धक्कादायक व्हिडीओ समोर आले आहेत. महिलांना प्रसाद म्हणून गुंगी येणारे औषध खाऊ घालून नंतर त्यांच्यावर अत्याचार केल्याचे खरातचे व्हिडीओ समोर आले आहेत. अशोक खरात स्वतःच्या कार्यालयातच धक्कादायक वर्तन करत होता. हा भयंकर प्रकार सुरू असताना खरातच्या नकळत त्याच्या ऑफिस बॉयने अर्थात नीरज जाधवने सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने ५८ व्हिडीओ रेकॉर्ड केले होते. दुष्कृत्य करूनही खरात समाजात 'साधू' म्हणून वावरत असल्याचे पाहून नीरजच्या मनात पैशांची हाव निर्माण झाली. नीरज जाधवने खरातला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. नीरज आणि त्याच्या काही साथीदारांनी या वादग्रस्त क्लिप्सच्या बदल्यात खरातकडे पाच कोटी रुपयांची खंडणी मागितली. खरातने पैसे देण्यास नकार दिला. यानंतर नीरजने अनपेक्षित अशी कृती केली. भोंदू बाबा खरातने ज्या महिलांचे शोषण केले त्यातल्याच एका महिलेला फोटो आणि व्हिडीओ पाठवून पैसे मागितले. या महिलेला जवळच्या नातलगांनी पोलिसांत तक्रार देण्याचा सल्ला दिला आणि संपूर्ण प्रकरणाला नवे वळण मिळाले. पोलिसांनी अशोक खरातला बलात्काराच्या आरोपात तर नीरजला खंडणीच्या आरोपात अटक केले. तथाकथित ज्योतिषी आणि अंकशास्त्रज्ञ अशोक खरात याची कोट्यवधींची संपत्ती आहे. या संपत्तीची प्राथमिक माहिती पोलिसांच्या हाती आली असून चौकशी सुरू आहे. एका ज्योतिषाकडे एवढी अफाट संपत्ती असल्याचे बघून पोलीसचही चकीत झाले आहेत. नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यात खरातने अफाट माया उभी केली आहे. या पैशांचे स्रोत शोधण्याचे काम पोलीस करत आहेत.

### चाकणकर यांनी अमावस्येला बोट कापुन केली काळी जादू

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदावरुन रूपाली चाकणकर यांना हटविण्यात यावे. बलात्कार प्रकरणातील आरोपी अशोक खरात आणि चाकणकर यांना समोरासमोर बसवून चौकशी करा आणि त्यांची नार्को टेस्ट करावी. तसेच त्यांना अटक झाली पाहिजे,अशी मागणी उध्दवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषदेत केली. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांनी २ सप्टेंबर २०२४ ला सोमवती अमावस्येच्या दिवशी स्वत:ची अनामिका (बोट) कापून अशा पद्धतीने तंत्र-मंत्र करतात असं पीडित महिला सांगतात. सप्टेंबर ते जानेवारी दरम्यान चाकणकर यांच्या हातावर जखम होती. हे गंभीर आहे" असेही त्यांनी सांगितले. रुपाली चाकणकर यांच्या सांगण्यानुसार त्यांचा व्यक्तीगत काही संबंध नाही, फक्त ट्रस्टपुरता संबंध होता असे सांगतात. मात्र चाकणकर यांनी खरात यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला आहे. ज्योतिष सांगणं वेगळं आणि तंत्र मंत्र विद्या करणं वेगळी गोष्ट आहे. काळी जादू, अघोरी विद्या अशा सर्व गोष्टी अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याचं उल्लंघन करतात. या सगळ्यात महिला आयोगाच्या अध्यक्ष पुढे असतात हे फार गंभीर आहे. काही पीडित महिलांशी बोलण्याचा प्रयत्न केला. त्या पीडित महिलांनी सांगितलं की, खरातांचे वडिल वारले तेव्हा चाकणकर होत्या. खरातांच्या पोरीचं लग्न जमलं तेव्हा चाकणकर पुढे होत्या. खरातांची भाची चाकणकरांच्या घरात राहते. खरात आणि चाकणकर यांचे फायनान्शिअल डॉक्युमेंट ते ही दोन दिवसात पुढे आणली जाईल.

## 'महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक' संविधानाच्या विरोधात

पुणे (दै. संध्या)



राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभेने महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक 2026 मंजूर केले. हे विधेयक मांडत असताना विरोधकांनी याला जोरदार विरोध केला होता. तसेच हे विधेयक एका समाजाला टार्गेट करत असल्याचा देखील आरोप करण्यात आला होता. आता यावर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी ट्विट करत टीका केली आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले, धार्मिक धर्मांतरांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेने मंजूर केलेले 'महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक, 2026' हे कायदेशीर कसोटीवर टिकणार नाहीये. कारण ते संविधानाच्या तत्त्वांचे उल्लंघन करते. ज्या राज्यांमध्ये अशा प्रकारचा कायदा स्वीकारला गेला आहे, तिथेही त्याला कायदेशीर आव्हानांचा सामना करावा लागत आहे. गेल्या आठ वर्षांत, नऊ राज्यांनी ज्यापैकी बहुतांश राज्यांमध्ये भाजपचे सरकार आहे, तिथे हिंदू महिलांचे सक्तीचे विवाह आणि धर्मांतर रोखण्यासाठी, तसेच कथित 'लव्ह जिहाद'ला आळा घालण्यासाठी अशाच प्रकारचे कायदे मंजूर केले आहेत.

## दुपारी १२ पर्यंत रुपाली चाकणकरांचा राजीनामा घ्या : हाके

मुंबई (दै. संध्या)



नाशिकमधील महिला अत्याचार प्रकरणात अटक झालेला भोंदू बाबा अशोक खरात याच्यासोबतचे पाद्यपूजन करतानाचे फोटो आणि व्हिडिओ समोर आल्यामुळे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. या धक्कादायक प्रकारामुळे विरोधी पक्षांनी त्यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी लावून धरली असून, आता सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण हाके यांनीही या वादात उडी घेतली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उद्या दुपारी 12 वाजेपर्यंत चाकणकर यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी हाके यांनी केली असून, या सर्व घडामोडींमुळे चाकणकर यांच्या पदावर टांगती तलवार निर्माण झाली आहे.

लक्ष्मण हाके म्हणाले, हा महाराष्ट्र फुले, शाहू, आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे. हा महाराष्ट्र पुरोगामी विचारांचा महाराष्ट्र आहे. महाराष्ट्रातील राजकारण्यांना, मंत्रिमंडळाला जर भोंदू बाबांनी विळखा घातला असेल, जादूटोणावाल्यांनी विळखा घातला असेल तर पुरोगामी महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली आहे. या रुपालीताई चाकणकरांचा उद्या 10, 11, 12 वाजेपर्यंत सुनेत्राताईंनी राजीनामा घ्यावा, नाही तर सुनेत्राताईंच्या घरासमोर आम्हाला उपोषणाला बसावे लागेल, असा इशारा हाके यांनी दिला आहे.

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, महिला आयोगाच्या अध्यक्षपदी सुमार दर्जाची महिला ठेवली. महाराष्ट्राने जादूटोणाविरोधी, भोंदूगिरी विरोधी कायदा केला आहे. स्वर्गीय आर.आर. आबा पाटलांनी पुढाकार घेऊन कायदा बनवला आहे. हा कायदा पायदळी तुडवण्याचे काम मंत्रिमंडळात बसलेले नेते करत असतील, महिला आयोगाच्या अध्यक्षपदी बसलेल्या रुपालीताई करत असतील तर याच्याहून वाईट काय असू शकते, असेही हाके म्हणाले.

उद्या दुपारी 12 वाजेपर्यंत रुपालीताईंचा राजीनामा आला पाहिजे, नाहीतर महाराष्ट्रात वेगळे आंदोलन उभे करावे लागेल. महिलांनी या रुपालीताईंकडून काय न्याय मागायचा. हे प्रकरण एपस्टीन फाईल पेक्षा वेगळे आहे.

## मिलेटचे महत्त्व लक्षात घेऊन महोत्सवाची व्याप्ती राज्यभर वाढविणार

मुंबई (दै. संध्या)

- पणन मंत्री जयकुमार रावल
- बोरीवली येथे तीन दिवसीय मिलेट महोत्सवाचे उद्घाटन




राज्यात ज्वारी, बाजरी, नाचणी ही प्रमुख तृणधान्ये (मिलेट्स) आहेत. कमी पाण्यावर येणारी तसेच पर्यावरणपूरक असण्याबरोबरच आरोग्यासाठी लाभदायी असणाऱ्या मिलेट्सना शेतातून थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने मिलेट्स महोत्सवाचे आयोजन मुंबईत करण्यात आले आहे. टप्प्याटप्प्याने मिलेट्स महोत्सव राज्यातील इतरही जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगत या महोत्सवास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले. बोरीवली पश्चिम येथील कोरा केंद्र मैदानावर आयोजित तिसऱ्या मिलेट्स महोत्सवाचे उद्घाटन मंत्री रावल यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार मनीषा चौधरी, नगरसेवक शिवानंद शेट्टी, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सर-व्यवस्थापक विनायक कोकरे आदी उपस्थित होते. २२ मार्च २०२६ पर्यंत हा महोत्सव नागरिकांसाठी खुला असणार आहे. पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले, जगभरातील तृणधान्य लागवडीला प्रोत्साहन मिळावे, या भूमिकेतून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने संयुक्त राष्ट्रात २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे करावे, असा ठराव मांडला होता. या ठरावाला ७१ सभासद देशांनी पाठिंबा दिल्याने संयुक्त राष्ट्राच्या वतीने जगभरात २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्रांनी (यूएन) २०२६ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून घोषित केले आहे. या उपक्रमाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासन कृषी आणि अन्न प्रणालीतील महिलांचे अमूल्य योगदान, सक्षमीकरण आणि त्यांच्यासमोरील आव्हानांना जागतिक स्तरावर ओळख मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहे. या निमित्ताने राज्यात 'महाराष्ट्र श्री अन्न (मिलेट) अभियान' सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. बदलत्या जीवनशैलीमुळे जगभरातील लोकांना स्थूलपणाचा तसेच त्यासोबत येणारा उच्च रक्तदाब, मधुमेहासारख्या आजारांचा सामना करावा लागत आहे.

## अशोक खरातसह रुपाली चाकणकरांचे अनेक फोटो व्हायरल!

महाड(दै. संध्या)



नाशिकमध्ये गुंगीचे औषध देऊन महिलांवर अत्याचार केल्याच्या गंभीर आरोपाखाली कॅप्टन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशोक खरातला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अटकेनंतर त्याला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने आरोपीला 24 मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातील धक्कादायक खुलासे समोर येत असतानाच पोलिस आता खरातच्या गुन्ह्यांची व्याप्ती आणि तांत्रिक पुराव्यांचा कसून तपास करत आहेत. दुसरीकडे, या प्रकरणामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचा अशोक खरातसोबतचा पाद्यपूजेचा व्हिडिओ आणि विविध कार्यक्रमांतील फोटो समोर आल्याने विरोधक आक्रमक झाले आहेत. शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे, रूपाली पाटील-ठोंबरे आणि सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. या वादाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

# चवदार तळे सत्याग्रहातून समतेची मुहूर्तमेढ – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### शताब्दी वर्षात समतामूलक भारताचा संकल्प

रायगड (दै. संध्या)



महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाच्या प्रारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समता, सामाजिक न्याय आणि संविधानिक मूल्यांचा पुनरुच्चार करत भेदभावमुक्त समाज घडविण्याचा निर्धार व्यक्त केला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झालेला हा सत्याग्रह केवळ पाण्यासाठी नव्हता, तर मानवतेच्या प्रतिष्ठेसाठीचा लढा होता, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत महाड (रायगड) येथे चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त भव्य कार्यक्रम पार पडला. या शताब्दी वर्ष कार्यक्रमाचा आरंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. चवदार तळ्याचे जलशुद्धीकरण आणि परिसराच्या सुशोभीकरणासाठी 55 कोटी 80 लाख निधी मंजूर करण्यात आला असून या कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, रोजगार हमी योजना फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले, महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, खासदार सुनील तटकरे, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रवीण दरेकर, महाड नगराध्यक्ष सुनिल कविस्कर, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, विविध विभागांचे अधिकारी, विविध सामाजिक संघटना आणि राज्यभरातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

यावेळी चवदार तळ्याच्या ठिकाणच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करून त्यांना मानवंदना देण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करत आपल्या भाषणाची सुरुवात करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 1923 मध्ये सार्वजनिक पाणवठे सर्वांसाठी खुले करण्याचा कायदा झाला तरी समाजातील काही घटकांनी त्याची अंमलबजावणी रोखली. या अन्यायाविरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेला चवदार तळे सत्याग्रह हा सामाजिक समतेचा क्रांतिकारी टप्पा ठरला. हा संघर्ष केवळ पाणी पिण्यासाठी नव्हता, तर विषमता आणि अस्पृश्यतेच्या व्यवस्थेविरुद्ध उभारलेला मानवतेचा लढा होता.

## संपादकीय

# जिल्ह्याजिल्ह्यांत नशामुक्तीचा संकल्प

भारत विकसित राष्ट्र बनविण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना समाज नशामुक्त असणे अत्यावश्यक आहे. तरुण पिढीला व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी आणि निरोगी समाज घडविण्यासाठी नशामुक्ती अभियान महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जनजागृती, समुपदेशन आणि सामूहिक प्रयत्नांमधूनच व्यसनमुक्त भारताचे स्वप्न साकार होऊ शकते. नशामुक्ती अभियान आपल्या भारत देशाच्या शतक महोत्सवी स्वातंत्र्याच्या वर्षापर्यंत विकसित भारत होण्यासाठी भारत सरकार प्रयत्नशील आहे. यासाठी देशातील सामाजिक परिस्थिती, पर्यावरणीय शाश्वतता, आर्थिक वाढ आणि सुशासन अशा विविध बाबींचा समावेश आहे. म्हणजे आपला देश एक विकसित राष्ट्र म्हणून ओळखला जाणार आहे; परंतु असे असले तरी त्या देशातील नागरिक नशामुक्त असले पाहिजेत तरच देश खऱ्या अर्थाने विकसित बनू शकतो. देशाच्या विकासासाठी नशामुक्ती होणे गरजेचे आहे. त्यासाठी देशात नशामुक्ती अभियानाच्या माध्यमातून प्रामाणिकपणे जनजागृती झाली पाहिजे. भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने १५ ऑगस्ट २०२० रोजी देशात नशामुक्ती भारत अभियान सुरू केले. प्रथम देशातील २७२ जिल्ह्यांत हे अभियान राबविण्याचे निश्चित करण्यात आले होते. सध्या ३७२ जिल्ह्यांमध्ये नशामुक्ती अभियान राबविले जात आहे. आपल्या देशात सन २०२१ मध्ये ७५२ जिल्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. उत्तर प्रदेश राज्यात सर्वात ७५ जिल्हे असून सर्वात कमी गोवा राज्यात २ जिल्हे आहेत, तर आपल्या महाराष्ट्र राज्यात ३६ जिल्हे आहेत. तेव्हा देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून प्रत्येक जिल्ह्यात नशामुक्ती अभियान राबविणे गरजेचे आहे. नशामुक्ती अभियानाचा मुख्य उद्देश मादक द्रव्यांपासून मुक्त करणे, तरुणाईला जागृत करणे आणि नशा व्यक्तींचे पुनर्वसन करणे ही आहेत. म्हणजे नशामुक्ती अभियान निरोगी जीवन आणि आनंददायी समाज घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यासाठी देशातील तरुणाईमध्ये नशामुक्ती विषयी जनजागृती अतिशय महत्त्वाची आहे. काही ठिकाणी नशा करून गळफास घेतल्याची उदाहरणे आहेत. तसेच अपघात झालेले आहेत तरी सुद्धा आकस्मिक मृत्यूची नोंद केली जाते. बस डेपोच्या परिसरात, रेल्वे पटरी, पडीत इमारतीमध्ये, वस्ती नसलेल्या रस्त्याच्या बाजूच्या झुडपात, फुटपाथ, रेल्वे प्लॅटफॉर्मवर इत्यादी ठिकाणी नशा करणारी मुले व वृद्ध व्यक्ती पाहायला मिळतात. यासाठी देशातील प्रत्येक जिल्ह्यात नशामुक्तीसाठी जनजागृती झाली पाहिजे. त्यासाठी मादक द्रव्यांच्या सेवनामुळे होणारे वाईट परिणाम सुजाण नागरिकांना सांगावे लागतील. यामध्ये सामाजिक संस्था, शिक्षण संस्था, विविध स्वयंसेवी संस्था अशा संस्थांमार्फत जनजागृतीची मोहीम हाती घ्यावी. तसेच त्या आनुषंगाने विविध कार्यक्रम राबविण्यात यावेत. व्यसनाधीन झालेल्या नागरिकांचे सुद्धा योग्यप्रकारे समुपदेशन करून त्यांचे पुनर्वसन करण्यात यावेत. यातून निरोगी समाज कसा निर्माण करता येईल त्या दृष्टिकोनातून मादक द्रव्यांचे प्रमाण कमी कसे करता येईल, त्याप्रमाणे प्रयत्न करावा. यातून देशात निरोगी समाज निर्माण करता येईल. याचा चांगला परिणाम लोकांचे सरासरी आयुर्मान वाढण्याला मदत होणार आहे. याला कारण वैद्यकीय सेवा आणि पोषण आहार म्हणता येईल. याच्या जोडीला नशामुक्ती महत्त्वाची आहे. सध्या देशात मादक द्रव्यांचा विचार केल्यास यात तरुण पिढी जास्त आहारी गेलेली दिसत आहे. यामुळे विकसित भारत राष्ट्र कसे होणार? केवळ जनजागृती करून चालणार नाही, तर शासन पातळीवर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. एकीकडे मादक द्रव्यांचे सेवन करण्यास प्रतिबंध करणे आणि दुसरीकडे शासन मान्य देशी दारूचे दुकान म्हणून मान्यता देणे. त्याला सुजाण नागरिकांनी विरोध केल्यास शासनाचा महसूल बुडतो अशी आरडाओरड सुरू केली जाते. मात्र यावरती कायदेशीरपणे प्रतिबंध होणे गरजेचे आहे.

## गुरु वचन

### सर्वांमध्ये प्रिती तत्व : ओशो

आपल्या प्रत्येकात 'प्रिती' नावाचे तत्व आहे, ज्याच्या आधारावर आपण जगतो. आपण चुक जगत असलो तरी 'प्रिती'च्या आधारावर जगत असतो.

पैसे कमावणाऱ्याची पैशांवर प्रिती असते. कुणी पदाच्या मागे धावत असेल पद गौण आहे पण प्रतिष्ठेवर प्रिती आहे. जिथे शोधाल तिथे तुम्हाला प्रिती सापडेल. कुणी वेश्यालयात गेले व एखाद्याने कुणाची हत्या केली. पापी माणसात व पुण्यात्मातही तुम्हाला प्रिती एकसाथ पाहण्यास मिळेल. मग प्रिती कुणासोबत झाली, त्याचे प्रकार पडतात. पैशावर लागली तर तुम्ही पैसेच होऊन जातात. कागदाच्या सडक्या नोटा होऊन मरतात.

हे मोठे पायाभूत सत्य आहे, यास हृदयात सांभाळून ठेवा. प्रिती महागडा सौदा असल्याने कुणासोबतही करु नका. प्रितीचा अर्थ – मी हे होऊ इच्छितो, असा होतो. राजनेता गावात आले व तुम्ही एकत्र जमून त्यांचे स्वागत केले. का केले? कारण तुमची इच्छा असते की, माझ्याकडेही पद असावे, प्रतिष्ठा असावी म्हणून पद व प्रतिष्ठेची पूजा आहे. एखादा भिकारी गावात आला व तुम्ही पोहोचले. त्याच्यासोबत तुमची प्रिती असल्याचे वृत्त मिळते की, भिकारी होण्यासाठी आतूर आहेस–कधी येईल तो मुक्तीचा क्षण, जेव्हा सर्व सोडून...कुठल्याही वस्तूवर माझी पकत्रड राहणार नाही. कुणी संगीत ऐकले तर हळुहळु त्याच्या हालचालीत संगीत दिसू लागते. तुम्ही ज्यावर प्रिती कराल तसे व्हाल.

प्रिती तत्वात रसायन असून प्रितीशिवाय कुणी राहू शकत नाही. प्रिती श्वासाप्रमाणे गरजेची आहे. जसे शरीर श्वासावर जगते, आत्मा प्रितीवर जगतो म्हणून जर तुमच्या जीवनात प्रिती नसेल किंवा तुमचा प्रितीचा सेतू तुटेल तेव्हा तुम्ही आत्महत्या कराल. घरास आग लागली व सर्व पैसे जळाले आणि तुम्ही आत्महत्या केली. तुम्ही म्हणतात की, हे घरच मी होतो व हेच माझी प्रिती होती. आता हेच नसल्यावर माझ्या राहण्यास काय अर्थ! तुमची पत्नी मरण पावली व तुम्ही आत्महत्या केली. तुम्ही म्हणतात की, तिच माझ्या प्रितीचा आधार होती. माझा संसार उद्ध्वस्तच झाला. आता माझा जगून काही उपयोग नाही.

आपण प्रितीशिवाय जगू शकत नाही. जसे श्वासाविना शरीर राहत नाही तसे प्रितीविना आत्मा राहत नाही. मग चुकीने प्रिती झाली तरी आत्मा टिकून राहते.

प्रितीचे अनेक प्रकार लक्षात घेतले पाहिजे. एक प्रिती जी तुमच्या पत्नीवर असते, मित्रांवर असते, पतीवर असते, भाऊ–बहिणीत असते. त्या प्रितीला आपण प्रेम संबोधतो.

आणखी एक प्रिती असते. जी आई–वडिल किंवा गुरुंप्रती असते, त्यास श्रद्धा म्हणतात. कुणी तुमच्यापेक्षा मोठे आहे. प्रितीला डोंगरावर चढावे लागते म्हणून श्रद्धा कठीण असते. श्रद्धेत डाव खेळावा लागते. श्रद्धेत चढाई असल्याने फार कमी लोकांमध्ये पाहण्यास मिळते. आई–वडिलांवर कोण प्रिती करतो! लोक कर्तव्य पार पाडताना दिसतात. मग प्रिती कुठे गेला? आपल्यापेक्षा मोठ्यांवर प्रिती करण्यात डोंगर चढण्याची हिम्मत असायला हवी व लक्षात ठेवा की, तुम्ही आपल्यापेक्षा मोठ्यांवर जेवढी प्रिती कराल तेवढे तुम्ही वर जाल. तुमच्या चेतना ऊर्ध्वगामी होतील म्हणून आम्ही श्रद्धेला खुप महत्व देतो. श्रद्धा माणसाला बदलते. ज्याच्या जीवनात श्रद्धा नाही त्याच्या जीवनात विकास नसतो.

आपल्यापेक्षा छोट्यांवर असलेल्या प्रितीस स्नेह म्हणतात. छोट्यांप्रती सच्ची प्रिती तेव्हाच होऊ शकते जेव्हा आपली मोठ्यांवर श्रद्धा असते. ज्या व्यक्तीच्या जीवनात आपल्यापेक्षा मोठ्यांप्रती श्रद्धा आहे, सम्यक श्रद्धा आहे, त्या व्यक्तीच्या जीवनात आपल्यापेक्षा छोट्यांप्रती सम्यक स्नेह असतो व त्या व्यक्तीच्या जीवनात आमुलाग्र बदल होतो–आपल्या समवयीनांप्रती सम्यक प्रेम असते. त्याच्या जीवनात प्रेमाचा छंद बांधला जातो.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८९३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 9 | 3 | | 4 | | | 7 |
| | 5 | | | | | 3 | 4 | |
| 1 | | | 2 | | | | 8 | |
| | | 1 | | 9 | | 6 | | 4 |
| 3 | 9 | | | 5 | | | 2 | 8 |
| 4 | | 8 | | 3 | | 7 | | |
| | 4 | | | | 6 | | | 9 |
| | 1 | 5 | | | | | 6 | |
| 2 | | | 5 | | 9 | 8 | | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ८९२ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 8 | 3 | 4 | 6 | 1 | 2 | 7 | 5 |
| 4 | 7 | 6 | 8 | 2 | 5 | 1 | 3 | 9 |
| 5 | 2 | 1 | 9 | 7 | 3 | 4 | 6 | 8 |
| 8 | 6 | 4 | 2 | 1 | 9 | 7 | 5 | 3 |
| 7 | 1 | 9 | 3 | 5 | 8 | 6 | 2 | 4 |
| 3 | 5 | 2 | 7 | 4 | 6 | 8 | 9 | 1 |
| 1 | 9 | 7 | 5 | 8 | 2 | 3 | 4 | 6 |
| 6 | 4 | 5 | 1 | 3 | 7 | 9 | 8 | 2 |
| 2 | 3 | 8 | 6 | 9 | 4 | 5 | 1 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८५७ – टोक्योमध्ये भूकंपामुळे १०,७००० ठार.
- १९३४ – जपानमध्ये आगीमुळे १५०० ठार.
- २००७ – पाकिस्तान हद्दीतील काश्मीरमध्ये जोरदार पावसामुळे झालेल्या भीषण भूस्खलनात ३७ जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- १७९१ – बंगलोर शहराच्या ताबा ब्रिटीशांकडे.
- १८३६ – कोलकतात भारतातील पहिले सार्वजनिक ग्रंथालय सुरू झाले. ते आता राष्ट्रीय ग्रंथालय बनले आहे.
- १९७७ – इंदिरा गांधींनी पुकारलेली आणीबाणी संपली.
- २००२ – पोटा विधेयक राज्यसभेने फेटाळले.
- २००५ – नरेंद्र मोदींना अमेरिकेने व्हिसा नाकारला.
- २००८ – समकालीन भारतीय कलाकृतींच्या एका लिलावात भारतीय चित्रकार एम.एफ.हुसेन यांच्या कलाकृतींनी नवा विश्वविक्रम रचला. हुसेन यांची कलाकृती 'बॅटल ऑफ गंगा ॲन्ड यमुना' (महाभारत) ला एक व्यक्तीने १६ लाख डॉलरमध्ये खरेदी केले.

### जन्म

- १६८५ – योहान सेबॅस्टियन बाख या संगीतकाराचा जन्म.
- १८४७ – मराठीतील आद्य विज्ञानप्रसारक बाळाजी प्रभाकर मोडक यांचा जन्म.
- १९१६ – आंतरराष्ट्रीत ख्यातीचे सनईवादक बिस्मिल्ला खाँ यांचा जन्म.
- १९६४ – वेद मेहता या दृष्टीहीन लेखकाचा जन्म.

### निधन

- १९७३ – प्रसिद्ध अभिनेते शंकर घाणेकर यांचे निधन.
- १९८३ – खटाव उद्योग समूहाचे अध्यक्ष धरमसी खटाव यांचे निधन.

### : SMS :

Dad:"When I beat you how do you control your anger??"
Tintumon:"I start cleaning the toilet"
Dad:"How does that help??"
Tintumon:"I clean it with your tooth brush"

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर दामप्त जीवनात कटुता येईल. रचनात्मक कामाचे फळ चांगले मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर सहकार्य व चांगले संबंध आर्थिक लाभ होईल. अडकलेले कामे पूर्णत्वाकडे जातील.

**मिथुन :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर मुलांच्या भविष्याची चिंता राहील. वडिलांच्या मार्गदर्शनाने व्यवसायातील अडचणी दूर होईल.

**कर्क :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: उत्तर दूरदर्शीपणा व बुद्धीच्या जोरावर अडचणींचा सामना कराल. आपल्या कामाची समाजात, घरात स्तुती होईल.

**सिंह :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पूर्व शत्रू आपल्या कामात बाधा आणण्याचा प्रयत्न करतील. भविष्याची काळजी राहील.

**कन्या :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम आपला प्रभाव वाढल्याने शत्रू परेशान होतील. सर्व कामे वेळेत पूर्ण होतील.

**तुळ :** शुभ रंग :पांढरा, शुभ दिशा : पूर्व आपल्या बुद्धीमत्तेची व दुरदर्शीपणाची समाजात स्तुती होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पश्चिम नोकरीत मनासारखी बदली किंवा पदोन्नती मिळण्याचे योग आहेत.

**धनु :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: पूर्व कौटुंबिक तणाव वाढणार आहे त्यामुळे अजिविकामध्ये अडचणी येतील. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.

**मकर :** शुभ रंग :लाल,शुभ दिशा:पूर्व मागील काही दिवसापासून अपूर्ण राहिलेले कामे पूर्ण होतील. घरगुती वाद मिटणार आहे.

**कुंभ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा : उत्तर संपत्ती सबंधीत असलेल्या कामात केलेली धावपळ फायदेशीर राहील. आर्थिक लाभ वाढणार आहे.

**मीन :** शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा: पश्चिम आपल्या प्रयत्नामुळे आपली स्थिती मजबूत कराल. कौटुंबिक सामजस्य राहील.


## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.७ | १९.८ |
| अहमदनगर | २९.८ | १८.८ |
| अकोला | ३४.१ | २२.७ |
| अमरावती | ३३.२ | २३ |
| बीड | ३४.३ | २३.९ |
| भंडारा | ३३.९ | २२.२ |
| बुलढाणा | २५.९ | १५.८ |
| चंद्रपूर | ३३.३ | २४.१ |
| चेन्नई | ३५.२ | २४.७ |
| नवी दिल्ली | २५.८ | १८.१ |
| धुळे | ३२.५ | २१.९ |
| गोंदिया | ३३ | २१.६ |
| जळगाव | ३२.९ | १९.८ |
| कोल्हापूर | ३०.८ | १८.८ |
| लातूर | ३१.४ | २०.४ |
| मुंबई | ३१.८ | २५.७ |
| नागपूर | ३३.७ | २२.८ |
| नांदेड | ३३.६ | २१.९ |
| नंदूरबार | ३०.८ | २० |
| नाशिक | ३०.१ | २०.५ |
| पुणे | २९.१ | १८.८ |
| पंढरपूर | ३२.३ | २०.२ |
| सातारा | ३०.६ | १७.७ |
| सांगली | ३२.३ | १९.३ |
| सोलापूर | ३२ | २०.९ |
| वर्धा | ३४.६ | २२.७ |

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:तैतिल १३:१५:०२ |
| २१ मार्च २०२६ | करण:गर २३:५६:४१ |
| शनिवार | सूर्य:मीन |
| विक्रम संवत्– २०८२ | चन्द्र:मेष०२:२७:३१ |
| चैत्रशके संवत्– १९४७ | हिजरी सन् – १४४६ |
| संवत्सर – पराभवनाम | मुस्लिम मास – शव्वाल |
| अयन– उत्तरायणारंभ | तारीख – १ |
| मास– फाल्गुन | विशेष |
| ऋतु– सौर वसंत | मत्स्य जयंती |
| शुक्ल पक्ष | गौरी तृतीया (तीज) |
| तिथि:तृतीया २३:५६:४१ | जमशेदी नवरोज |
| नक्षत्र:अश्विनी | रमजान ईद |
| २४:३७:३१+ | मुस्लिम शव्वाल मासारंभ |
| योग:ऐन्द्र १९:००:३७ | विषुवदिन |

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८९३



**आडवे शब्द**

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे–येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र, ७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

**उभे शब्द**

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार ओळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई–वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य, ४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण, ६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा, ७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

**जम्बो शब्दकोडे क्र. ८९२ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.रातोरात ४.छायाचित्र ६.जन गण मन ११.रुपाया १३.नवार १४.जर १५.खराब १७.भारवाहक १९.जून २१.दलाल २३.जमा २५.शाहीर २७.कडकड २९.मतदार ३१.नगद ३२.कारण ३४.धनी ३५.कर्म ३६.पाळीव ३८.विणकर ४०.पालम ४२.लघु ४३.जुना ४४.मातीमोल ४६.नगर ४८.तनय ५१.यमल ५२.हकनाक ५४.आजतक ५६.किसान ५८.गवगवा ५९.परागंदा ६०.धमाल ६१.तेरडा ६२.नत ६४.अननस ६५.सर ६६.आज ६७.प्रवाह ६९.कबरस्तान ७१.सर ७२.नरबळी ७४.दर्द ७५.जनककन्या ७८.तलाशी ७९.समस्त ८०.नातलग ८१.रमा

उभे उत्तर : २.तोतरा ३.तरू ४.छाया ५.चिक्कार ६.जनकजननी ७.नवा ८.गरजू ९.मज १०.नरवर १२.पायल १५.खडक १६.बदक १७.भारत १८.वावर २०.नशा २२.लाडका २४.माग २६.हीरक २८.डहाळी २९.मण ३०.दाभण ३३.रस्सी ३४.धरती ३६.पाळत ३७.वलय ४१.मनकवडा ४५.मोहन ४७.रविवासर ४९.नजरानजर ५०.तेज ५३.नागर ५४.आदानप्रदान ५५.तक्क्या ५७.सालस ६०.धनवान ६१.तेजाब ६३.तवा ६५.सनदशीर ६६.आसपास ६८.हस्तक ६९.कळी ७०.रयत ७३.रचना ७५.जस्त ७६.कट्टा ७७.न्यायी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### विष्णू पाटील यांनी गावपण जपले : ज्येष्ठ समाजसेवक, प्रवचनकार डॉ. रवींद्र भोळे

पुणे (दैनिक संध्या) : जीवनामध्ये प्रत्येकाने समाजऋण फेडण्याचा यथाशक्ती प्रयत्न करून अडलेल्या व्यक्तींना सहकार्याची भावना ठेवावी. त्यांनी सामाजिक बांधिलकी जपून विदर्भातील ग्रामीण भागातून येऊन सुद्धा आज पुणे दिघी येथे ते समाजऋण फेडण्याचा छोटासा प्रयत्न करीत आहेत. विष्णू पाटील यांनी गावपण जपले असे मत ज्येष्ठ समाजसेवक, प्रवचनकार डॉ. रवींद्र भोळे यांनी येथे व्यक्त केले. विष्णू नामदेव पाटील यांच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्ताने श्री संत आदिशक्ती मुक्ताई देवस्थान भोसरी दिघी येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी येथील जेष्ठ समाजसेवक, प्रवचनकार, अपंग सेवक डॉ. रवींद्र भोळे यांनी विष्णू पाटील यांना पद्मश्री डॉ.मणीभाई देसाई प्रतिष्ठान व डॉ. रवींद्र भोळे चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने मानपत्र प्रदान केले. या कार्यक्रमाला व्यासपीठावर श्री संत आदिशक्ती मुक्ताई देवस्थान अध्यक्ष अमोल विष्णू पाटील, नितीन विष्णू पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अण्णासाहेब पाटील, नितीन बोंडे, यांचे सह अनेक मान्यवर, उपस्थित होते. ह्यावेळी स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते.

### विक्रम गोखले यांची अखेरची कलाकृती "बेवारस" लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला




पुणे (दैनिक संध्या) : मराठी रंगभूमी, मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीतील महान अभिनेते, दिवंगत विक्रम गोखले यांचा अखेरचा चित्रपट आता प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. अतिशय हृदयस्पर्शी कथा असलेला 'बेवारस' हा चित्रपट आता लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर या चित्रपटाचं पोस्टर लाँच करण्यात आलं आहे. हरिणी प्रॉडक्शन्स निर्मित "बेवारस" या चित्रपटाची प्रस्तुती शिव आर्यन फिल्म्सनं केली आहे. हरिणी प्रॉडक्शन्सच्या रिया कुमार, नितीन विचारे यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे . चित्रपटाची कथा आणि दिग्दर्शन विजय राणे यांचं आहे.तर पटकथा, संवाद लेखन शिरीष लाटकर यांचे आहे. गीतलेखन आणि संगीत दिग्दर्शन विवेक आपटे, यूजीन डिसोझा आणि महेश कोळी यांनी छायांकन, अमीर हडकर यांनी पार्श्वसंगीत तर यश सुर्वे यांनी संकलन केलं आहे. चित्रपटात विक्रम गोखले यांच्यासह तेजस्विनी पंडित, रोहिणी हट्टंगडी, उषा नाईक, निहार गिते, ऋतुजा बागवे, उदय टिकेकर, विद्याधर जोशी, श्रीजित मराठे, आदित्य देशमुख यांच्या प्रमुख भूमिका आहेत. डोळे भरून आलेल्या विक्रम गोखले यांनी एका लहान मुलाला मिठी मारल्याचं चित्र पोस्टरवर आहे. पोस्टरप्रमाणेच चित्रपटाची कथा अत्यंत हृदयस्पर्शी आहे. अनाथालय चालवणाऱ्या तत्त्वनिष्ठ आबाजींची भूमिका विक्रम गोखले यांनी साकारली आहे. एक लहान मुलगा आपल्या अधिकारांसाठी आपल्याच आई वडिलांना कोर्टात का खेचतो? याची अनोखी कथा या चित्रपटात दाखविण्यात आली असून सोबत सामाजिक परिस्थितीचा पदरही या कथानकाला आहे. त्यामुळे विक्रम गोखले यांची अखेरची कलाकृती असलेल्या या चित्रपटाविषयी आता उत्सुकता निर्माण झाली आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख लवकरच जाहीर केली जाणार आहे.



### मंडईजवळील स्वामी समर्थ मठातर्फे स्वामी प्रकट दिनानिमित्त जन्मसोहळा व पाळणा

पुणे (दैनिक संध्या) : श्री स्वामी समर्थ... स्वामी समर्थ महाराज की जय... चा जयघोष आणि फुलांनी सजविलेल्या पाळण्यामध्ये सकाळी सुर्योदयानंतर झालेल्या श्री स्वामी समर्थ प्रकटदिनी झालेल्या जन्मसोहळ्यात पुणेकरांनी भक्तीभावाने सहभाग घेतला. मंदिरामध्ये स्वामींच्या मूर्तीला पोशाख, दागिने आणि गाभाऱ्यात फुलांची आकर्षक आरास व विद्युतरोषणाई करण्यात आली. महात्मा फुले मंडईजवळील रामेश्वर चौकातील श्री अक्कलकोट स्वामी महाराज संस्थान, बुधवार पेठच्या श्री स्वामी समर्थ मठात स्वामी प्रकटदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थानचे अध्यक्ष गजानन जेधे, कोषाध्यक्ष संदीप होनराव, विश्वस्त रविंद्र शेडगे, विक्रम आगाशे, श्रीराम पुरंदरे, डॉ.अमित वाडदेकर यांसह कार्यकर्ते व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाविकांना प्रसाद म्हणून ५० हजार बेसन लाडू वाटप करण्यात आले. स्वामी प्रकटदिनानिमित्त शुक्रवारी पहाटे ३ वाजता श्रींचा लघुरुद्र अभिषेकाचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर ज्येष्ठ कीर्तनकार वासुदेवबुवा बुरसे यांचे प्रकटदिनाचे कीर्तन झाले. सायंकाळी फुलांनी सजविलेल्या पालखीतून श्री अक्कलकोट स्वामी महाराजांच्या पादुकांची मिरवणूक उत्साहात काढण्यात आली. कमलेश कामठे म्हणाले, श्री अक्कलकोट स्वामी महाराज संस्थान, रामेश्वर चौक, शनिपार, निंबाळकर तालीम, खुन्या मुरलीधर मंदिर, चित्रशाळा चौक, मोदी गणपती, ओंकारेश्वर, शनिवारवाडा, देसाई महाविद्यालय, छत्रपती शिवाजी रस्ता, श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंदिर, दत्तमंदिर मार्गे श्री अक्कलकोट स्वामी महाराज संस्थान येथे मिरवणुकीचा समारोप झाला. यामध्ये आदिमायेची मूर्ती, प्रभात बँड, नादब्रह्म ट्रस्ट ढोल ताशा पथक यांसह भाविक पारंपरिक वेशात सहभागी झाले होते. ठिकठिकाणी भाविकांनी पालखीचे उत्साहात स्वागत केले.

### गुढीपूजन व फुलांची आरास

पुणे (दैनिक संध्या) : श्री गणेश नामाचा जयघोष...फुलांची आकर्षक आरास...रांगोळीच्या पायघड्या...बँडचे मंगलध्वनी अशा मंगलमय वातावरणात दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात गुढीपाडवा साजरा करण्यात आला. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळतर्फे गणपती मंदिराच्या ४२ व्या वर्धापनदिनी गुढीपाडव्याला मंदिराच्या प्रवेशद्वारात उभारण्यात आलेल्या भव्य गुढीचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पहाटेपासूनच चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी गणरायाचे दर्शन घेण्याकरीता पुणेकरांनी मोठया संख्येने गर्दी केली. परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले यांच्या हस्ते गणरायाची आरती करून गुढीपूजन करीत गुढी उभारण्यात आली. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, मंगेश सूर्यवंशी, विलास रासकर, गजानन धावडे, बंडू गावडे, अथर्व केदारी यांसह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वल्लभेश मंगलम् विवाह सोहळा 'दगडूशेठ' गणपती मंदिरात थाटात साजरा

## श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट ; चैत्र शुद्ध द्वितीयेला मंदिरात आयोजन

पुणे (दै. संध्या) :



भगवान वल्लभेशांच्या महामिलनाचा महोत्सव म्हणजे वल्लभेश मंगलम. त्यामुळेच शुभमंगल सावधान चे मंगल सूर... अक्षता व फुलांची उधळण... ब्रह्मवृंदांनी केलेले मंत्रपठण... आणि मोरया, मोरया च्या जयघोषात चैत्र शुद्ध द्वितीयेला सकाळी १० वाजून ५७ मिनिटांनी श्री वल्लभेश मंगलम् हा श्री गणेश आणि देवी वल्लभा यांचा विवाह सोहळा दगडूशेठ गणपती मंदिरात थाटात पार पडला. सोहळा अनुभविण्याकरिता पुणेकरांनी मोठी गर्दी केली. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे भगवान श्री गणेश व देवी वल्लभा यांचा विवाह सोहळा मंदिरात आयोजित करण्यात आला होता. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. वेदमूर्ती मिलिंद राहुरकर गुरुजी यांनी सोहळ्याचे पौरोहित्य केले. श्री गणेश व देवी वल्लभा यांच्या मूर्ती सभामंडपात ठेऊन सर्व पारंपरिक विधी पार पडले. ब्रह्मवृंदांनी केलेल्या मंत्र पठणाने या विवाह सोहळ्याला वेगळी उंची प्राप्त झाली. सभामंडपात विविधरंगी फुलांची आकर्षक आरास करुन लग्नमंडपाचे स्वरुप देण्यात आले होते. ट्रस्टचे विश्वस्त, पदाधिकारी व कार्यकर्ते व-हाडी मंडळीच्या भूमिकेत असल्याने पारंपरिक वेशात लग्नसोहळ्यात सहभागी झाले होते. भगवान श्री गणेशाच्या शक्तींचा उल्लेख केला की आपल्या डोळ्यासमोर देवी सिद्धी आणि बुद्धी यांचा विचार येतो. तथापि गाणपत्य संप्रदायात श्री गणेशांच्या विविध शक्तींचा उल्लेख केलेला आहे. परब्रह्म परमात्मा भगवान श्री गणेश आपल्या स्वानंदेश स्वरूपात एकटे एकटे विद्यमान असतात. कधीतरी त्या परमात्म्याला अनेकत्त्वाची इच्छा जागृत होते. या इच्छेला उपनिषदांनी एकोऽहम! बहुस्याम! अशा स्वरूपात वर्णन केले. ब्रह्मणस्पतीला अशी इच्छा झाल्यावर त्या इच्छापूतीर्साठी ते आपल्या योगमायेला जागृत करतात. ही त्यांची योगमायाच देवी वल्लभा नावाने ओळखली जाते. ती मोरयाची अत्यंत प्रिय असल्याने तिला वल्लभा असे म्हणतात. एकट्याच मोरयाच्या स्वरूपात सर्व विश्वाचा आरंभ आहे. आता या मायेचा रूपात दोन स्वरूपात नटलेला असतो. त्यामुळे या देवी वल्लभेच्या प्रगटीकरणाची, मोरयाने तिच्यासह नटण्याची तिथी चैत्र शुद्ध द्वितीया असते. निर्गुण निराकार त्रिगुणातीत परब्रह्म म्हणजे भगवान श्री गणेश. तर आत्ममायायुक्त सगुण साकार त्रिगुणात्मक परब्रह्म म्हणजे श्री गुणेश. देवी वल्लभा आणि तिने युक्त असणाऱ्या भगवान वल्लभेशांच्या महामीलनाचा महोत्सव म्हणजे वल्लभेश मंगलम आहे. त्यामुळे हा सोहळा मंदिरात थाटात साजरा झाला.

## "बनवा बनावी" नाटकातून प्रभात थिएटर्सचा अनोखा प्रयोग!!

पुणे (दै. संध्या) :

■ सात इन्फ्ल्यूएन्सर्स पहिल्यांदाच झळकणार रंगभूमीवर




मराठी रंगभूमीवर सध्या खूप नवीन नवीन प्रयोग सुरु आहे. त्यातच एका नवीन प्रयोगाची भर त्यात पडणार आहे. सोशल मीडियावर धुमाकूळ घालणारी इन्फ्ल्यूएन्सर गँग आता रंगभूमीवर येण्यास सज्ज झाली आहे. गुढी पाडव्याच्या दिवशी ह्या गँगच्या "बनवा बनवी" या नवीन नाटकाचा मुहूर्त पार पडला. "लागली पैज" नंतर प्रभात थिएटर्सची दुसरी निर्मिती असलेल्या या व्यावसायिक नाटकाचे नाव "बनवा बनवी" असून नाटकाच्या नावाला देखील एक कल्ट व्हॅल्यू आहे. श्रीमती ज्योती प्रमोद कठापूरकर आणि श्री.निखिल एकनाथ करंडे हे ह्या नाटकाचे निर्माते आहेत तर सौं. प्रियंका हेमंत जोगी या नाटकाच्या सह निर्मात्या असून हर्षद प्रमोद कठापूरकर हे या नाटकाचे कार्यकारी प्रमुख म्हणून काम पाहणार आहेत.

"बनवा बनवी" नाटकाचे लेखन आणि दिग्दर्शन समीर खांडेकर यांचे असून शंतनू रांगणेकर, ऋषभ मोरे, सुमित चव्हाण, ओंकार कदम, सोनाली गुरव,सिद्धी पोतदार आणि सुधाकर सोनावणे ही सात जणांची गँग या नाटकात धिंगाणा घालण्यासाठी सज्ज झाली आहे. नाटकाचे नेपथ्य डॉ. सुमित पाटील करणार असून, चारूलता देशपांडे नाटकाच्या वेशभूषेची सांभाळणार आहेत. हे सगळे अतरंगी कलाकार प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी एकत्र आले आहेत. आम्ही फक्त 2 मिनिटाचे कलाकार नसून पूर्ण वेळ नाटक करण्याची क्षमता आमच्यातदेखील आहे आणि ते सिद्ध करण्यासाठीच आम्ही सगळे जण हे नाटक करत आहोत अशी भावना शंतनू रांगणेकर ह्याने व्यक्त केली.

या नाटकाचे लेखक, दिग्दर्शक समीर खांडेकर म्हणाले की मी स्वतः मूळ नाटकवालाच आहे आणि त्यात माझं स्वतःच आसोवा नावाचं युट्यूब चॅनल आहे. त्यामुळे नाटकाबरोबर इन्फ्ल्यूएन्सर गँगशी माझं कायम जवळचं नातं राहिलं आहे. त्यांच्यातल्या टॅलेंटला चॅनलाइज करण्यासाठी आणि ह्यांच्यात प्रत्येकात असलेल्या नाटकाचं पॅशन बघून मला हे नाटक लिहावंस वाटलं. शेखर दाते नाटकाचे सूत्रधार म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत. आता लवकरच हे नाटक रंगभूमीवर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## सव्वा वर्षात पुरस्कारांच्या शतकाची गुढी

पुणे (दै. संध्या) :

गेल्या सव्वा वर्षात विविध साहित्यकृतींचा गौरव होऊन वाङ्मयीन पुरस्कारांचे शतक राजहंस प्रकाशनाने पार केले आहे. प्रकाशनाच्या पुस्तकाला सलग चौथ्या वर्षी जाहीर झालेल्या साहित्य अकादमी पुरस्कारासह विविध पुस्तकांना विविध संस्थांचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ, पर्यावरणशास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ, रंगकर्मी चंद्रकांत कुलकर्णी, अभिराम भडकमकर, प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, ज्येष्ठ कथक नृत्यगुरू शमा भाटे, बँकिंगतज्ज्ञ विद्याधर अनास्कर, निवेदिका शैला मुकुंद, अरुण खोपकर, मृणालिनी चितळे, श्रीधर लोणी, डॉ. अभय बंग आणि डॉ. राणी बंग, प्रा. शेषराव मोरे, डॉ. मृदुला दाढे, डॉ. अपूर्वा जोशी, प्रिया निघोजकर अशा मान्यवर लेखकांच्या साहित्यकृतींना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यापैकी ३६ पुस्तकांना दोन किंवा तीन पुरस्कार प्राप्त झाले आहेत. 'ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर (कुसुमाग्रज प्रतिष्ठानाचा जनस्थान पुरस्कार), दिलीप कुलकर्णी (श्री. ग. माजगावकर पुरस्कार), अरुण खोपकर (महाराष्ट्र फाउंडेशनचा साहित्य जीवनगौरव पुरस्कार) या राजहंस प्रकाशनाच्या लेखकांचा सन्मान झाला आहे. एखाद्या प्रकाशन संस्थेला इतक्या मोठ्या संख्येने पुरस्कार मिळण्याचा बहुमान प्राप्त होणे ही साहित्य आणि प्रकाशन क्षेत्रातील विरळ अशी आनंददायी घटना आहे,' अशी भावना राजहंस प्रकाशनाचे संचालक दिलीप माजगावकर यांनी व्यक्त केली.

## चार वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पीएमपी, स्मार्ट सिटीला मिळाले संचालक !

पुणे (दै. संध्या) :

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्याने पुणे महापालिकेवर गेल्या चार वर्षापासून प्रशासकराज होते. त्यामुळे पीएमपीसह पुणे स्मार्ट सिटी कंपनीची संचालक पदे रिक्त होती. महापालिका निवडणुका झाल्याने महापालिकेचे सभागृह पुन्हा अस्तित्वात आले आहे. त्यामुळे रिक्त असलेली संचालक मंडळातील सदस्यांची पदे भरण्यात आली आहे. पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) संचालक मंडळावर भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक अजय खेडेकर यांची नियुक्ती करण्यात आली. तर, पुणे स्मार्ट सिटी कंपनीच्या संचालक मंडळावर काँग्रेसचे विशाल मलके आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनिता इंगळे या दोन सदस्यांची निवड करण्यात आली.

महापालिकेची सर्वसाधारण सभा नवीन इमारतीमधील सभागृहात झाली. सभापती परशुराम वाडेकर होते. पीएमपी संचालकपदी नगरसेवक खेडेकर यांच्या नावाची शिफारस भाजपकडून करण्यात आली. त्याला सर्वांनी अनुमोदन दिले. तर स्मार्ट सिटीवर दोन संचालकांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

## इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व पुरस्कार प्रदान

पुणे (दै. संध्या) :



अनेक प्रकारच्या सामाजिक सेवा देणाऱ्या पुना नॉर्थ रोटरी चॅरिटेबल ट्रस्ट आणि रेफ्रिजरेशन व कोल्डचेन या क्षेत्रांतील आंतरराष्ट्रीय स्तरावरील सल्लागार एसीआर प्रोजेक्ट कन्सल्टन्टस, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांना सलग ११ व्या वर्षी आज मराठवाडा मित्रमंडळ, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कर्वेनगर पुणे येथे शिषवृत्या व पुरस्कार प्रदान करण्यात आले.

या समारंभाच्या वेळी रोटरी क्लब ऑफ पुना नॉर्थचे अध्यक्ष मोहन पुजारे, दीप्ती पुजारे, दीपक टक्कर एसीआर प्रोजेक्ट कन्सल्टन्टस पुणे चे अरविंद सुरंगे(अध्यक्ष), रवी फडणीस, हर्षल सुरंगे,चेतन ठाकूर (अध्यक्ष,ईशरे,पुणे),सुभाष खनाडे, डॉ. विकास देऊळगावकर, प्रा. विजय भटकर तसेच रोटरी,ईशरे व शैक्षणिक संस्थेतील मान्यवर उपस्थित होते. अरविंद सुरंगे म्हणाले, "ईशरे पुणेच्या विद्यार्थी सदस्यांना अशी शिष्यवृत्ती प्रदान करण्याचे हे ११वे वर्ष आहे. गुणवत्ता, रेफ्रिजरेशन आणि एअर कंडिशनिंग या विषयातील प्राविण्य आणि आर्थिक गरज या आधारावर १४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. जागतिक तापमानवाढीमुळे आणि अन्न व औषध निर्मिती क्षेत्रासाठी एसी व कोल्ड चेन स्टोरेजला असलेल्या जगभरातील उच्च मागणीमुळे या क्षेत्रात वाढलेल्या मागणीचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना केले."

या समारंभात प्राजक्ता असबे,तेजश्री चव्हाण,तन्वी काळे,ऐश्वर्या काळे,मानसी म्हस्के अस्मि चौधरी,वैष्णवी भांगे,सस्मित पानसे ,किरण सिरसाट,संतोष फाफळे या विद्यार्थ्यांना दहा ते पंधरा हजार रुपये प्रत्येकी अशी शिष्यवृत्ती व प्रशस्तीपत्रे देण्यात आली.हे सर्व विद्यार्थी आशरे/ ईशरे पुणे स्टुडन्ट चॅप्टर चे सभासद आहेत.

प्रा.डॉक्टर भटकर यांनी कार्यकमाचे चांगले आयोजन केले. दीपक टक्कर यांनी आभार मानले.

# हंगामा ओटीटी : फसवणूक आणि घातक रहस्यांच्या गुंतागुंतीचा खेळ

### *पवित्रा पुनिया, जोहैब अश्रफ आणि आभास मेहता यांची प्रमुख भूमिका असलेली हंगामा ओटीटी वरील थ्रिलर जंग*

पुणे (दै. संध्या) :




हंगामा ओटीटी ने आपली नवीनतम क्राईम ड्रामा मालिका जंग लॉन्च केली असून, ही रोमांचक मालिका 18 मार्च 2026 रोजी प्रदर्शित झाली आहे. गुजरातमधील अलंग शीप ब्रेकिंग यार्ड या कठोर आणि वास्तववादी पार्श्वभूमीवर आधारित ही मालिका विश्वासघात, जगण्यासाठीची झुंज आणि दडलेली सत्ये यांची कहाणी उलगडते.

जंग च्या कथानकाच्या केंद्रस्थानी कावेरी ही एक एकाकी गृहिणी आहे, जी आपल्या शांत आणि साध्या वाटणाऱ्या पती बकुलसोबत नीरस वैवाहिक आयुष्यात अडकलेली आहे. भावनिक आधाराच्या शोधात ती एका स्क्रॅपयार्डमध्ये काम करणाऱ्या व्यक्तीसोबत गुप्त संबंध प्रस्थापित करते. सुरुवातीला साधा वाटणारा हा संबंध लवकरच ब्लॅकमेलिंगमध्ये परिवर्तित होतो आणि ती गुन्हेगारी, फसवणूक आणि खून यांच्या धोकादायक जाळ्यात अडकते. दरम्यान, तपासाची सूत्रे इन्स्पेक्टर सार्थक (जोहैब अश्रफ) यांच्या हाती येतात, ज्यांचा कावेरीसोबत गुंतागुंतीचा भूतकाळ आहे. तपास जसजसा पुढे सरकतो, तसतसे अधिक गडद सत्य समोर येते. कावेरी नकळत एका मोठ्या खेळाचा भाग बनलेली असते, जो तिचाच पती बकुल चालवत असतो. तो गुप्तपणे एक शक्तिशाली ड्रग साम्राज्य चालवत असून, कावेरीचा वापर आपल्या शत्रूंना संपवण्यासाठी करत असतो.

नात्यांमध्ये तडे जाऊ लागतात आणि धोका जवळ येत असताना, कावेरीला आपल्या परिस्थितीचा सामना करावा लागतो. परिस्थितीच्या टोकावर पोहोचलेली कावेरी अखेर एक असा निर्णय घेते जो सर्व काही बदलून टाकतो. ती सावल्यांमधून बाहेर येत अलंग शिपयार्डमध्ये अंतिम, जीवघेण्या संघर्षाला सामोरी जाते, जिथे जगण्यासाठीची किंमत खूप मोठी असते. कावेरीची भूमिका साकारणाऱ्या पवित्रा पुनिया म्हणाल्या, "कावेरी हे अतिशय बहुपेडी पात्र आहे, जी भावनिकदृष्ट्या अत्यंत तीव्र प्रवासातून जाते. सुरुवातीला ती परिस्थितीमुळे असहाय वाटते, पण कथानक पुढे सरकत असताना तिच्यातील ताकद आणि जिद्द समोर येते. एका स्त्रीच्या स्वातंत्र्य आणि जगण्यासाठीच्या संघर्षाची ही कथा मला खूप भावली." इन्स्पेक्टर सार्थकची भूमिका साकारणाऱ्या जोहैब अश्रफ म्हणाले, "जंग हा असा क्राईम थ्रिलर आहे जो प्रत्येक वळणावर प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडतो. गुपिते, विश्वासघात आणि अनपेक्षित ट्विस्ट्सने भरलेल्या या कथेत पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारणे आव्हानात्मक आणि रोमांचक होते. तपास जसजसा पुढे जातो, तसतसे अधिक गडद सत्य समोर येत जाते."

बकुलचा व्यावसायिक भागीदार नकुलची भूमिका साकारणाऱ्या संदीप आनंद म्हणाले, "माझे पात्र या कथेत उलगडणाऱ्या सत्तेच्या आणि गुन्हेगारीच्या जगाशी जवळून जोडलेले आहे. जंग मधील प्रत्येक पात्रात अनेक स्तर आणि लपलेले हेतू आहेत, हे विशेष आकर्षक आहे."

बकुलची भूमिका साकारणाऱ्या आभास मेहता म्हणाले, "बकुल हे खूप रोचक पात्र आहे. बाहेरून तो शांत आणि साधा दिसतो, पण त्याच्या आत खूप काही दडलेले आहे. अशा गुंतागुंतीच्या पात्राची भूमिका साकारणे आव्हानात्मक आणि उत्साहवर्धक होते. ही कथा फसवणूक, सत्ता आणि सूड यांच्या प्रवासावर घेऊन जाते."

सस्पेन्स, भावनिक संघर्ष आणि उच्च-स्तरीय नाट्य यांचा संगम असलेली जंग सत्ता, विश्वासघात आणि जिद्द या संकल्पनांचा वेध घेते, आणि देशातील अत्यंत प्रभावी व दृश्यदृष्ट्या वेधक अशा पार्श्वभूमीवर उलगडते.

ही मालिका आता हंगामा ओटीटी वर स्ट्रीमिंगसाठी उपलब्ध असून, टाटा प्ले बिंग, वॉचो, प्लेबॉक्स टीव्ही, एअरटेल एक्सस्ट्रीम प्ले तसेच इतर प्लॅटफॉर्मवरही उपलब्ध आहे.

# अश्वारोहण स्पर्धेत पुण्याची दिग्विजय हॉर्स रायडिंग अकॅडमी अजिंक्य

## पुणे महापौर चषक राज्यस्तरीय अश्वारोहण स्पर्धा ; स्टेट इक्वेस्ट्रियन असोसिएशनचा सहभाग

पुणे (दै. संध्या) :

पुणे महानगरपालिकेतर्फे आयोजित पुणे महापौर चषक राज्यस्तरीय अश्वारोहण स्पर्धेत पुण्याच्या दिग्विजय हॉर्स रायडिंग अकॅडमीने ५२ पदके मिळवित अजिंक्यपद मिळविले. अश्वारूढ क्रीडा असोसिएशनच्या खेळाडूंनी १९ पदकांची कमाई करीत द्वितीय तर ला फेन्स क्लबने १० पदके मिळावीत तृतीय क्रमांक पटकाविला. स.प. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर ही स्पर्धा झाली.




स्पर्धेत स्टेट इक्वेस्ट्रीयन असोसिएशनचा सहभाग आहे. स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी नगरसेवक राघवेंद्र उर्फ बापू मानकर, स्वप्नाली पंडित, श्रुती टिळक, जनक टेकाळे, नितीन पंडित, शिरीष मोहिते, सुनील भिडे, नितीन खत्री यांसह पदाधिकारी कर्नल सरप्रताप सिंग, गुणेश पुरंदरे, नरेंद्र पाटील, विनायक हळबे, निकेत देसाई, आशिष जाधव, शशिकांत थोरात, अजित टाकळकर आदी यावेळी उपस्थित होते. विजेत्यांना २ लाख ४० हजार रुपयांची पारितोषिके देण्यात आली.

याशिवाय आरएलएमएसएस स्कूल आणि एसएसपीएमएसच्या संघाने प्रत्येकी ८ पदके, एम.एन. हॉर्स रायडिंग अकॅडमी आणि राज अश्व हॉर्स रायडिंग अकॅडमी संघाने प्रत्येकी ६ पदके तर हेरिटेज स्कूल संघाने ५ पदकांची कमाई केली. विजेतेपद पटकाविलेल्या दिग्विजय हॉर्स रायडिंग अकॅडमीने २५ सुवर्ण, १८ रौप्य आणि ९ ब्राँझ पदके मिळावीत अजिंक्यपद राखले.

संक्षिप्त निकाल : शो जंपिंग टॉप स्कोर : खुला गट - अजय पाल सिंग (सुवर्ण), जितीन सिंग राजपुरोहित (रौप्य), विठ्ठल जिगे (ब्राँझ). युवा गट - यश भिडे (सुवर्ण), समर्थ राजपूत (रौप्य), विराज पारखे (ब्राँझ). ज्युनिअर - संस्कार सुतार (सुवर्ण), आयवाना फर्नांडिस व शौर्य निकाते (रौप्य), चिल्ड्रेन १ - मायरा वालेचा व साईशा ढोबळे पाटील (सुवर्ण), मायरा वालेचा (ब्राँझ). चिल्ड्रेन २ - स्वयंम संचेती (सुवर्ण), ओजस शेरे (रौप्य), रिशान सुवर्णा (ब्राँझ).

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 31 मार्चपूर्वी कर्ज भरा अन् व्याजमाफीचा लाभ घ्या ! सहकारी बँकेमार्फत सर्वाधिक वितरण

गडचिरोली (दैनिक संध्या) : मार्च महिना संपण्यास केवळ १२ दिवसांचा कालावधी शिल्लक असल्याने जिल्ह्यातील बँकांमध्ये पीक कर्ज भरण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी लगबग पाहायला मिळत आहे. विशेषतः जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखांमध्ये कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्यांच्या रांगा लागत आहेत. ३१ मार्चपूर्वी कर्जाची परतफेड केल्यास शून्य टक्के व्याजदराचा लाभ मिळत असल्याने शेतकरी इकडून तिकडून पैशांची जुळवाजुळव करत बँकांकडे धाव घेत आहेत. शासनाच्या धोरणानुसार, ३१ मार्चपर्यंत कर्जाचा भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याजातून पूर्णतः माफी मिळते. हे बिनव्याजी कर्ज जवळपास नऊ ते दहा महिने वापरता येत असल्याने शेतकऱ्यांसाठी हा पर्याय अत्यंत फायदेशीर ठरत आहे. मागील खरीप हंगामात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने जिल्ह्यातील २२ हजार ५०४ शेतकऱ्यांना सुमारे १२५ कोटी ४१ लाख रुपयांचे कर्ज वितरित केले होते. १८ मार्चपर्यंतच्या आकडेवारीनुसार, १४ हजार २५३ शेतकऱ्यांनी ७३ कोटी ५७लाख रुपयांच्या कर्जाची परतफेड केली आहे. ही एकूण वाटपाच्या ५८.६६ टक्के वसुली असून, उर्वरित १२ दिवसांत यात मोठी वाढ होण्याची शक्यता बैंक प्रशासनाने वर्तवली आहे. अनेक शेतकऱ्यांनी शासकीय आधारभूत केंद्रांवर धानाची विक्री केली आहे. मात्र, अद्याप थानाचे चुकारे त्यांच्या खात्यात जमा झालेले नाहीत. एकीकडे ३१ मार्चची मुदत जवळ आली आहे आणि दुसरीकडे हातात पैसे नाहीत, अशा कात्रीत शेतकरी सापडला आहे. व्याजाचा भुर्दंड टाळण्यासाठी अनेक शेतकरी उसनवारी करून किंवा खासगी सावकारांकडून पैसे घेऊन बँकेचे कर्ज नील करत असल्याचे चित्र आहे.

### 'नो हेल्मेट... नो राईड... नो एक्सक्यूज' हेल्मेट वापरासाठी संयुक्त मोहीम

नागपूर (दैनिक संध्या) : दुचाकी चालवताना हेल्मेट न घातल्यामुळे देशात दरवर्षी तब्बल ५० हजारांहून अधिक लोकांचा हकनाक बळी जातो. हे विदारक वास्तव बदलण्यासाठी आणि नागरिकांमध्ये हेल्मेटच्या वापराबाबत गांभीर्य निर्माण करण्यासाठी शुक्रवारी जागतिक मेंदू दुखापत जनजागृती दिनानिमित्त नागपूर पोलीस आणि न्यूरोलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया यांच्यातर्फे 'नो हेल्मेट... नो राईड... नो एक्सक्यूज' या मोहिमेची सुरुवात करण्यात आली. पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र कुमार सिंगल यांच्या हस्ते या घोषवाक्याचे आणि मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. न्यूरोलॉजिकल सोसायटी ऑफ इंडियाचे कार्यकारिणी सदस्य आणि 'हेड इंज्युरी' उपक्रमाचे संयोजक, प्रसिद्ध न्यूरोसर्जन प्रा. डॉ. प्रमोद गिरी यांच्या संकल्पनेतून ही मोहीम साकारण्यात आली.

## विदर्भाला अवकाळी पावसाचा येलो अलर्ट !

नागपूर (दै. संध्या) :

विदर्भात सध्या हवामानात मोठे बदल होत असून, हवामान विभागाने पुढील काही दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. या कालावधीत विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळी पाऊस, विजांचा कडकडाट आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, विदर्भातील बहुतांश भागात सध्या ढगाळ वातावरण निर्माण झाले असून, पुढील 48 तासांत मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. काही भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाची गारपीटही होऊ शकते. विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये आज दुपारी ४ नंतर पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विशेषतः नागपूर, गोंदिया आणि अमरावती जिल्ह्यांत काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह गारपीट होऊ शकते. तसेच बुलढाणा, अकोला, चंद्रपूर आणि भंडारा येथे ताशी सुमारे ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याचा अंदाज असून, विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. वर्धा, गडचिरोली, यवतमाळ आणि वाशिम या जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

याशिवाय, मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात ताशी ५० ते ६० किमी वेगाने वारे वाहण्याचा अंदाज असून, तेथेही विजांसह पावसाची शक्यता आहे.

## सिग्निफायने पुण्यात दुसरे फिलिप्स विझ स्टोअर केले सुरू

पुणे (दै. संध्या) :

सिग्निफाय (युरोनेक्स्ट: लाईट), जगातील अग्रगण्य लाइटिंग कंपनीने आज पुण्यात दुसरे फिलिप्स विझ स्टोअर सुरू केल्याची घोषणा केली. यामुळे कंपनीने आपली रिटेल उपस्थिती अधिक मजबूत केली असून ग्राहकांना कनेक्टेड लाइटिंग सोल्यूशन्सचा नवीनतम अनुभव अधिक जवळून मिळणार आहे. हे स्टोअर लाइट आयडिया या भागीदाराद्वारे चालवले जाते आणि येथे फिलिप्स स्मार्ट LED उत्पादने, विझ प्लॅटफॉर्मवर आधारित, अनुभवण्याची संधी ग्राहकांना मिळते. स्टोअरचे डिझाइन फिलिप्सच्या विझ प्लॅटफॉर्मवर आधारित स्मार्ट लाइटिंग सोल्यूशन्सच्या विस्तृत पोर्टफोलिओचे प्रदर्शन करण्यासाठी करण्यात आले आहे. ग्राहकांना येथे कनेक्टेड लाइटिंग कसे दैनंदिन जीवन बदलू शकते याचा अनुभव घेता येतो. मोबाईल ॲप्स, व्हॉईस असिस्टंट्स आणि स्मार्ट स्विचेसद्वारे दिवे सहजपणे नियंत्रित करता येतात. या स्टोअरमध्ये ग्राहकांना प्रत्यक्ष अनुभव घेता येईल अशी व्यवस्था आहे. वेगवेगळे लाइटिंग सीन, ऑटोमेशन फीचर्स आणि विविध मूड व जागांसाठी वैयक्तिकृत लाइटिंग अनुभव येथे पाहता येतात.



या उद्घाटनाबद्दल सिग्निफाय ग्रेटर इंडिया येथील स्मार्ट होम्स बिझनेसचे कमर्शियल लीडर राजत पाहवा म्हणाले, "भारतामध्ये कनेक्टेड होम्सची लोकप्रियता वाढत आहे आणि स्मार्ट लाइटिंग हे लोकांच्या घरांच्या डिझाइन व अनुभवाचा महत्त्वाचा भाग बनत आहे. पुण्यातील या फिलिप्स विझ स्टोअरच्या उद्घाटनातून आम्ही ग्राहकांना सहज वापरता येणारी आणि सोपी स्मार्ट लाइटिंग सोल्यूशन्स उपलब्ध करून देण्याची वचनबद्धता दाखवतो. विझ प्लॅटफॉर्मद्वारे वापरकर्ते आपले लाइटिंग सहजपणे वैयक्तिकृत करू शकतात, आराम वाढवू शकतात आणि घरात डायनॅमिक अनुभव तयार करू शकतात."

पुणे हे वाढत्या तंत्रज्ञान क्षेत्र आणि डिझाइनला महत्त्व देणाऱ्या ग्राहकवर्गामुळे कनेक्टेड लाइटिंग सोल्यूशन्ससाठी एक मजबूत बाजारपेठ ठरत आहे. फिलिप्स विझ स्टोअरच्या उद्घाटनामुळे सिग्निफाय आपले नाविन्यपूर्ण स्मार्ट लाइटिंग पोर्टफोलिओ ग्राहकांपर्यंत आणण्याचा उद्देश ठेवत आहे. यामुळे ग्राहकांना तंत्रज्ञान, डिझाइन आणि सोयीचा अखंडित संगम अनुभवता येणार आहे.

## 'आगीशी खेळू नका, अन्यथा काळा इतिहास बाहेर काढेन'

सांगली (दै. संध्या) :

सांगली जिल्हा परिषदेची निवडणूक पार पडली. जिल्हा परिषदेत महाविकास आघाडीने भाजपचा पराभव केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या संगीता पाटील यांची जिल्हा परिषदेचे अध्यक्षपदी निवड झाली. दरम्यान, यावेळी आमदार जयंत पाटील यांनी माजी खासदार संजयकाका पाटील यांच्यावर खोचक टोला लगावला होता. या टीकेला आज पाटील यांनी प्रत्युत्तर दिले. माजी खासदार संजयकाका पाटील यांनी जयंत पाटील यांच्यावर गंभीर आरोप करत मोठा राजकीय बॉम्ब टाकला आहे. "जयंत पाटील स्वतः भाजपमध्ये जाण्यासाठी आग्रही होते आणि त्यासाठी त्यांनी किती वेळा उंबरे झिजवले, याचा साक्षीदार मी स्वतः आहे," असा खळबळजनक दावा संजयकाका यांनी केला आहे. काही दिवसांपूर्वी जयंत पाटील यांनी संजयकाका पाटील यांच्यावर टीका करताना, "संजयकाका पाटील यांना आपणच भाजपमध्ये पाठवले होते," असे विधान केले होते. जयंत पाटलांच्या याच विधानाचा समाचार घेताना संजयकाकांनी आज जोरदार पलटवार केला. संजयकाका पाटील यांनी जयंत पाटलांना थेट जाहीर आव्हान दिले आहे. "जर जयंत पाटील म्हणत असतील की त्यांनी मला भाजपमध्ये पाठवले, तर त्यांनी आपल्या मुलाच्या डोक्यावर हात ठेवून ही शपथ घेऊन सांगावी," अशा शब्दांत त्यांनी जयंत पाटलांची कोंडी केली आहे.

## जिवा स्टोर्सचा 'अनलॉक द बॉक्स' ज्वेलरी एक्सपिरीयन्स लाँच

### शहरातील ग्राहकांना ₹१०,००० पर्यंत किमतीचे जिवा ज्वेलरी अनलॉक करण्याची संधी

पुणे (दै. संध्या) :

देशभरात ३०० हून अधिक स्टोअर्स असलेल्या भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या उत्तम दागिन्यांपैकी एक असलेल्या जिवाने पुण्यात 'अनलॉक द बॉक्स' हे इंटरएक्टिव्ह रिटेल ॲक्टिव्हेशन सुरू केले आहे. हा ब्रँड शहरातील ग्राहकांना एक अनोखा दागिने शोधण्याचा अनुभव घेण्यासाठी आमंत्रित करत आहे.

मोहिमेचा एक भाग म्हणून, पुण्यातील सर्व २० जिवा स्टोअर्समध्ये पारदर्शक दागिन्यांचे बॉक्स ठेवण्यात आले आहेत, ज्यामुळे खरेदीदारांना आकर्षक बक्षिसे अनलॉक करण्यास प्रोत्साहन मिळते. ग्राहकांना




त्यांच्या जवळच्या जिवा स्टोअरला भेट देण्यासाठी आणि त्यांचे नशीब आजमावण्यासाठी आमंत्रित करून शहरात चाव्या वितरित केल्या जात आहेत.

सहभागी त्यांची चावी स्टोअरमध्ये आणू शकतात आणि दागिन्यांचा बॉक्स उघडण्याचा प्रयत्न करू शकतात. ज्या भाग्यवान विजेत्याची चावी बॉक्स अनलॉक करते त्याला ₹१०,००० पर्यंतचे बक्षीस मिळेल. ज्या ग्राहकांना चावी बॉक्स अनलॉक करण्यात अयशस्वी झाली त्यांना स्टोअरमध्ये विशेष सवलत देखील मिळेल. दुकानातील प्रत्येक अभ्यागताला एक संस्मरणीय अनुभव मिळावा हे एकंदर ध्येय आहे. हे सक्रियकरण १४-१५ मार्च रोजी सुरू झाले आणि उर्वरित महिनाभर सुरू राहील, ज्यामुळे पुणेकरांना एक अतुलनीय ब्रँड अनुभव मिळेल. आजच्या ग्राहकांना उत्तम दागिने उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून स्थापन झालेली जिवा एका मजबूत डी२सी प्रणालीद्वारे देशभरात आपली उपस्थिती वेगाने वाढवत आहे. ब्रँडने आपले ऑफलाइन रिटेल नेटवर्क ३०० हून अधिक स्टोअरमध्ये वाढवले आहे.


## ग्रामपंचायत वनपुरी, ता. पुरंदर जि. पुणे

**B-1 टेडर नोटीस क्र.१ सन २०२५/२६**

ग्रामपंचायत वनपुरी, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत वनपुरी ता. पुरंदर जि. पुणे यांच्याकडुन दिनांक २१/०३/२०२६ ते दिनांक २८/०३/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी /ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम GST सह | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | जगतापवस्ती येथे पेविंग ब्लॉक बसवणे. | ७९९७१७/- | दि २१/०३/२०२६ ते दि २८/०३/२०२६ | ५९०/- | ७९९७/- |
| २ | बंदिस्त गटर करणे. | १४४१४२/- | | २३६/- | १४४१/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी व इसारा रक्कम ग्रामपंचायत वनपुरी PDCC बँक शाखा सासवड खाते क्र. ००६००२५०००००१९२ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील व खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश /डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत वनपुरी यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत वनपुरी, ता. पुरंदर जि. पुणे


## डायकिन इंडियाकडून एआय आधारित 'व्हीआरव्ही अल्फा' एसी श्रेणी सादर

### ऊर्जा कार्यक्षमता, स्मार्ट तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक उपायांवर भर; शोजो अँडो यांची पत्रकार परिषदेत माहिती

पुणे (दै. संध्या) :

डायकिन एअरकंडिशनिंग प्रा. लिमिटेडने २०२६ सालासाठी आपल्या नव्या एअर कंडिशनिंग उत्पादन श्रेणीचे अनावरण करत कूलिंग क्षेत्रात महत्त्वाची झेप घेतली आहे. या नव्या श्रेणीत ऊर्जा कार्यक्षम रूम एसी मॉडेल्ससोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित 'व्हीआरव्ही अल्फा' मालिका सादर केली आहे. या नव्या श्रेणीमध्ये ऊर्जा कार्यक्षमता, स्मार्ट तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक उपायांवर भर दिला आहे, अशी माहिती डायकिन इंडियाचे उपव्यवस्थापकीय संचालक शोजो अँडो यांनी पत्रकार परिषदेत दिली. सेनापती बापट रस्त्यावरील हॉटेल जेडब्ल्यू मेरीयटमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेवेळी संचालक व वरिष्ठ उपाध्यक्ष संजय गोयल, पश्चिम विभागीय वरिष्ठ उपाध्यक्ष उल्हास शर्मा व ऑपरेशन्स हेड (महाराष्ट्र व गोवा) उपस्थित होते.




शोजो अँडो म्हणाले, "कंपनीने सादर केलेली रूम एसी श्रेणी ब्युरो ऑफ एनर्जी एफिशिएंसीच्या २०२६ स्टार रेटिंग मानकांनुसार विकसित करण्यात आली असून, ती 'रिस्पॉन्सिबल कुलिंग' या संकल्पनेवर आधारित आहे. या एसींमध्ये पेटंटेड स्ट्रीमर डिस्चार्ज तंत्रज्ञानाद्वारे हवा शुद्धीकरण, कार्यक्षम स्विंग कॉम्प्रेशर, स्मार्ट आयओटी कनेक्टिव्हिटी, डीएनएनएस अँटी-कॉरोजन कोटिंग आणि ५४ अंश सेल्सिअस तापमानातही प्रभावी कूलिंग देणारे हाय-अँबियंट परफॉर्मन्स तंत्रज्ञान यांसारखी वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत.

या श्रेणीत ५-स्टार इन्व्हर्टर स्प्लिट एसींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. शांत कार्यप्रणाली, जलद कूलिंग आणि लक्षणीय वीज बचत ही या मॉडेल्सची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे प्रीमियम शहरी ग्राहकांसोबतच प्रथमच एसी खरेदी करणाऱ्यांसाठीही ही श्रेणी आकर्षक पर्याय ठरणार आहे. व्यावसायिक आणि उच्च-स्तरीय निवासी प्रकल्पांसाठी सादर करण्यात आलेली 'व्हीआरव्ही अल्फा' सिरीज ही एआय आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञानावर आधारित आहे. ही प्रणाली हवामानातील बदल ओळखून स्वतःचे कार्य समायोजित करते आणि सर्वोत्तम कामगिरी साध्य करते. त्यामुळे ऊर्जा बचत आणि वापरकर्त्यांचा आराम या दोन्ही बाबींमध्ये सुधारणा होते. आधुनिक पायाभूत सुविधांच्या गरजा लक्षात घेऊन विकसित केलेली ही प्रणाली कनेक्टिव्हिटी आणि कार्यक्षमतेवर भर देते, असे त्यांनी नमूद केले.

भारतीय ग्राहकांना अत्याधुनिक आणि ऊर्जा कार्यक्षम उत्पादने देण्यासाठी कंपनी कटिबद्ध आहे.

**व्हीआरव्ही अल्फाची प्रमुख वैशिष्ट्ये**

- विजेची मोठी बचत करणारे तंत्रज्ञान
- उत्कृष्ट कूलिंग
- हवामानानुसार टिकणारी कामगिरी
- गरजेनुसार वाढवता येणारी आणि -शक्तिशाली यंत्रणा.
- क्लाउड आधारित एआय (AI) सोल्यूशन

**डायकिन इंडियाविषयी**

- डायकिन इंडियाची वार्षिक उलाढाल १.५ बिलियन अमेरिकन डॉलर
- भारतातील गुंतवणूक: २८०० कोटी रुपये
- उत्पादन प्रकल्प: नीमराना आणि श्री सिटी
- तीन अत्याधुनिक संशोधन आणि विकास केंद्रे
- एक 'डीजीआयएमई' आणि दोन 'एसीडीसी'
- 'डायकिन-रेची' संयुक्त भागीदारी
- नेका' पुरस्कार २०२५ चे विजेते

## पोलिसांकडून कसून चौकशी

पुणे (दै. संध्या) : महिलांचे लैंगिक शोषण केल्या प्रकरणी अटकेची कारवाई झालेला स्वयंघोषित ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात याची सध्या पोलिसांकडून कसून चौकशी सुरू आहे. तसेच पोलिसांकडून सुरू असलेल्या चौकशीमधून खरात याचे एकापाठोपाठ एक कारनामे समोर येत आहेत. दरम्यान, हा खरात महिलांना आपल्या जाळ्यात कसा ओढायचा याची माहितीही या चौकशीमधून समोर आली आहे.


## ग्रामपंचायत उदाचीवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे

**B-1 टेडर नोटीस क्र. १ सन २०२५/२६**

ग्रामपंचायत उदाचीवाडी, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत उदाचीवाडी ता. पुरंदर जि.पुणे यांच्याकडुन दिनांक २१/०३/२०२६ ते दिनांक २८/०३/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व पोस्टाने समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी /ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम GST सह | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | जि.प. शाळा हगवणेवाडी येथे सार्वजनिक शौचालय बांधणे. | २९९९९२/- | दि २१/०३/२०२६ ते दि २८/०३/२०२६ | २३६/- | ३०००/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २. कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत उदाचीवाडी PDCC बँक शाखा सासवड खाते क्र. ००६००२५००००००६८ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील तसेच ग्रा.प. खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश /डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३. या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४.. आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत उदाचीवाडी यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत उदाचीवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे



MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## SHORT E-TENDER NOTICE

E-Tender offers are invited on **Service charge per Month per person** basis from the Reputed Licensed Labour Contractors/Suppliers and who are Registered Contractor under **MSEDCL** Online Registration System for works and Contracts and who fulfill the pre-qualifying conditions for following works –

| Sr. No | Tender Specification No. | Name of Work | Estimated Amount in Rs. (Excl.GST) | EMD Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | SEC/PUNE/T-19/ 2025-26 | Engaging Outsource employees for the period of 12 months for various offices under Civil Division Pune | 58.34 lakhs | Rs. 24,719/- |

Tender Fee **(with 18% GST)**, for each tender copy to be paid by e-payment only directly to our MAHADISCOM A/c net banking. Other details of e-tender are available on www.mahadiscom.in from **date 21.03.2026 to 27.03.2026 up to 15.00 Hrs.** For any other details please contact to - The Manager (HR), Civil Circle, Pune, **7875767814.** Office Address - Superintending Engineer (Civil), Pune Civil Circle, Block No. 302, Second Floor, Administrative Bldg., Rasta Peth, Pune -11. Agencies are requested to visit our Website to register themselves for this and future e-Tenders.

**PRO No. PZ- 250/2025-26** **Superintending Engineer (C) Civil Circle, Pune**

# दर्जेदार आणि सर्वसमावेशक शिक्षण पोहोचविण्याचा अनोखा प्रयत्न

पिंपरी (दै. संध्या) :

■ आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी : अधिकाधिक पालकांनी पाल्यांना महापालिका शाळांमध्ये प्रवेश घेऊन येथील गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेवर विश्वास ठेवावा असे आयुक्त यांचे आवाहन

■ महापालिकेच्या वतीने 'गुढीपाडवा पट वाढवा' अभियानाचा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते शुभारंभ




'गुढीपाडवा - पट वाढवा' हे अभियान केवळ प्रवेश वाढविण्यापुरता मर्यादित नसून, प्रत्येक मुलापर्यंत दर्जेदार आणि सर्वसमावेशक शिक्षण पोहोचविण्याचा एक व्यापक प्रयत्न आहे. महापालिका शाळांमधील आधुनिक सुविधा, समर्पित शिक्षकवर्ग आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रम यांच्या बळावर शिक्षणाची भक्कम पायाभरणी होत आहे,त्यामुळे अधिकाधिक पालकांनी या गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेवर विश्वास ठेवून आपल्या पाल्यांचा महापालिका शाळांमध्ये प्रवेश घ्यावा, तसेच या शैक्षणिक चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले. राज्य शासनाच्या सूचनेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चिखली येथील म्हेत्रेवाडी शाळा क्र. ९३ येथे गुढीपाडव्याच्या निमित्ताने "गुढीपाडवा पट वाढवा" या विशेष प्रवेश अभियानाचा शुभारंभ आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नव्याने शाळेत शाळेत प्रवेश घेऊन आपल्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात करणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत आयुक्त यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी शिक्षण समिती सभापती रविना अंगोळकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, नगरसदस्य यश साने, नगरसदस्या रिटा सानप, प्रियंका कुदळे, माजी नगरसदस्य सचिन सानप, शिक्षण विभागाच्या उप आयुक्त ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, मुख्याध्यापिका स्नेहल मोरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह शाळेतील शिक्षिका, कर्मचारी आणि विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, गुढीपाडवा हा आपल्या संस्कृतीतील नवचैतन्य, नव्या सुरुवातीचा सण आहे. याच शुभमुहूर्तावर 'गुढीपाडवा पट वाढवा' या उपक्रमाचा शुभारंभ करताना मला विशेष आनंद होत आहे. राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून, शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणणारा आहे.कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असताना अशाच स्वरूपाचा उपक्रम राबविण्यात आला होता. त्यावेळी नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प आणि मिठाई देऊन स्वागत करण्यात येत असे. त्या छोट्याशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आपुलकी निर्माण झाली आणि पालकांचा विश्वासही वाढला. आज हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात व्यापक स्वरूपात राबविला जात असल्याचा मला आनंद आहे.अनेकदा महापालिका शाळांबाबत पालकांध्ये गैरसमज आढळून येतात. मात्र, प्रत्यक्षात या शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रम प्रभावीपणे राबविले जातात. या सकारात्मक बाबींची माहिती पालकांपर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणे ही महापालिका शाळांची विशेषता आहे.विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यावर अधिक भर दिल्यास निश्चितच पटसंख्या वाढण्यास मदत होईल. माझ्या स्वतःच्या शालेय जीवनात मला ६ ते ८ रुपयांची शिष्यवृत्ती मिळायची. त्या छोट्याशा रकमेनेही शिक्षणाबद्दलची प्रेरणा वाढत असे. त्यामुळे अशा योजनांचा विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर दीर्घकालीन सकारात्मक परिणाम होतो, यावर माझा ठाम विश्वास आहे.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमध्ये कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक आणि कर्मचारी अत्यंत कुशल, समर्पित आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी कटिबद्ध आहेत. विशेषतः म्हेत्रेवाडी येथील शाळेतील महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण लक्षणीय असून, त्यांचे योगदान शिक्षण व्यवस्थेला अधिक सक्षम बनवते. माझी आई देखील मुख्याध्यापिका होती, त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील जबाबदाऱ्या आणि मूल्यांची मला जाणीव आहे, महापालिका शाळांचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी आणि पटसंख्या वाढविण्यासाठी आम्ही लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि नागरिक यांच्या समन्वयातून 'गुढीपाडवा पट वाढवा' हा उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येईल असेही आयुक्त डॉ. सूर्यवंशी म्हणाले. शिक्षण समितीच्या सभापती रविना अंगोळकर म्हणाल्या, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण व्यवस्थेत महापौर रवि लांडगे आणि नवनियुक्त आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या सहकार्याने निश्चितच सकारात्मक बदल घडतील, असा विश्वास आहे. आज महापालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांना खाजगी शाळांच्या तोडीस तोड अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक साधनसामग्री आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांमुळे पालकांचा महापालिका शाळांवरील विश्वास अधिक दृढ होत आहे, ही अत्यंत समाधानाची बाब आहे. 'गुढीपाडवा पट वाढवा' या अभियानाच्या माध्यमातून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून अधिकाधिक विद्यार्थ्यांना महापालिका शाळांकडे आकर्षित करण्यावर भर दिला जाणार आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थिनींनी योगाच्या माध्यमातून सादर केलेली गणेश वंदना विशेष आकर्षण ठरली. सातवी व आठवीतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या योगनृत्याने उपस्थितांची मनं जिंकली. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी तसेच उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या या उत्कृष्ट सादरीकरणाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मास्टर ट्रेनर आनंदी जंगम यांनी, सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर उपस्थितांचे आभार अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी मानले. कार्यक्रमानंतर आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी यावेळी संपूर्ण शाळेची पाहणी करून विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांबाबत माहिती घेतली. म्हेत्रे वाडी शाळा क्र. ९३ ही बालवाडी ते आठवीपर्यंत शिक्षण देणारी महापालिकेची दर्जेदार शाळा असून सध्या येथे एकूण ८७५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

> पिंपरी चिंचवड शहरातील महापालिका शाळा केवळ शैक्षणिक गुणवत्तेपुरत्या मर्यादित नसून, विविध उपक्रम आणि आधुनिक अध्यापन पद्धतींचा अवलंब करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहेत. काही विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा क्षेत्रातील विशेष कौशल्य आढळून येते. अशा विद्यार्थ्यांना लहान वयापासून योग्य प्रशिक्षण, पोषण आणि मार्गदर्शन दिल्यास ते राज्य व राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवू शकतात.
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 'वेस्ट टू आर्ट'चा अनोखा उपक्रम; महापौर रवि लांडगे यांचा शहरभर विस्ताराचा निर्धार

पुणे (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'क' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक ०६, धावडेवस्ती येथे "स्वच्छ सर्वेक्षण २०२६" आणि "माझी वसुंधरा ६.०" अभियानाच्या पार्श्वभूमीवर 'वेस्ट टू आर्ट' या अभिनव उपक्रमांतर्गत जनजागृतीपर कार्यक्रम उत्साहात पार पडला. शहर स्वच्छतेसोबतच वसुंधरापूरक दृष्टीकोन रुजविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या कार्यक्रमास महापौर रवि लांडगे, नगरसदस्या राजश्री लांडगे, माजी नगरसदस्य राजेंद्र लांडगे, मुख्य आरोग्य निरीक्षक सतीश इंगेवाड, वैभव घोळवे, आरोग्य निरीक्षक राजेंद्र उजिनवाल यांच्यासोबत अन्य मनपा अधिकारी, कर्मचारी स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होते. भोसरी येथील कोंडीबा लांडगे मार्ग, धावडे वस्ती परिसरात स्वच्छता मोहिम राबवून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर 'वेस्ट टू आर्ट' उपक्रमांतर्गत टाकाऊ वस्तूंमधून आकर्षक सजावटीच्या वस्तू तयार करून परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले. या उपक्रमामुळे 'टाकाऊ वस्तूपासून कलाकृती' हा संदेश नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचला. यावेळी महापौर रवि लांडगे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांना कचरा न टाकण्याचे आणि शहर स्वच्छ राखण्याचे आवाहन केले. तसेच परिसरातील आर.आर.आर. सेंटरची पाहणी करून पुनर्वापराच्या संकल्पनेला अधिक बळ देण्यावर भर दिला. कार्यक्रमादरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सफाई सेवकांचा गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थित नागरिकांनी 'माझी वसुंधरा' ६.० अभियानांतर्गत सामूहिक शपथ घेत वसुंधरा संवर्धनाचा निर्धार व्यक्त केला. महापौरांनी यावेळी 'वेस्ट टू आर्ट' उपक्रम शहरभर राबविण्याचा मानस व्यक्त करत, स्वच्छ व सुंदर पिंपरी चिंचवडसाठी नागरिकांच्या सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन देखील केले.

### आयुक्त यांनी दुर्गादेवी टेकडीसह शहरातील विविध विभागांची केली पाहणी



■ कचरा व्यवस्थापन व आरोग्य सेवांचा घेतला आढावा

पुणे (दैनिक संध्या) : पिंपरी, दि. १८ मार्च २०२६ - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांनी आज सकाळी दुर्गादेवी टेकडीसह शहरातील विविध भागांची पाहणी करत स्वच्छता आणि आरोग्य व्यवस्थेचा सखोल आढावा घेतला. कुदळवाडी, चिखली, पुनावळे, तळवडे, रुपीनगर आणि त्रिवेणी नगर या परिसरांमध्ये प्रत्यक्ष भेट देत त्यांनी कचरा व्यवस्थापन, रस्त्यांची स्वच्छता तसेच नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांची स्थिती तपासली. दुर्गा देवी टेकडी परिसराची पाहणी करताना आयुक्त यांनी तेथील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक सुविधांची स्थिती तपासली. तसेच परिसरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांचीही त्यांनी पाहणी केली. स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता, देखभाल आणि नागरिकांसाठी स्वच्छ व सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी सूचना दिल्या. दुर्गादेवी टेकडी हे ठिकाण शहराच्या वैभवात भर घालणारे ठिकाण असून अनेक नागरिक तेथे भेट देत असतात, त्यामुळे याठिकाणी नागरिकांना पर्याप्त सुविधा उपलब्ध असल्या पाहिजेत. याठिकाणी विविध प्रकारच्या वनस्पती आणि वृक्षांच्या प्रजातीही पाहायला मिळत असल्याने त्यांचे जतन आणि संवर्धन करण्याबाबत देखील त्यांनी सूचना केल्या. शिवाय, त्यांनी तेथील नागरिकांशीही संवाद साधून त्यांचे म्हणणे जाणून घेतले. याशिवाय त्यांनी सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी करत पाणी शुद्धीकरण प्रक्रियेची माहिती घेतली. तसेच निगडी येथील यमुनानगर आरोग्य कार्यालयाला भेट देत तेथील कामकाजाचा आढावा घेतला आणि कार्यालयातील दैनंदिन हजेरी नोंदवह्या तपासल्या. तसेच, सर्व कर्मचाऱ्यांनी वेळेचे काटेकोर पालन करावे आणि नागरिकांना सेवा देताना कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. यावेळी सहाय्यक आरोग्याधिकारी महेश आढाव, मुख्य आरोग्य निरीक्षक कांचनकुमार इंदलकर, आरोग्य निरीक्षक रामचंद्र शिंगाडे, सहाय्यक आरोग्य निरीक्षक रवी रोकडे, आरोग्य मुकादम मल्लिकार्जुन कुरवार आदी कर्मचारी उपस्थित होते.


# सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिक वापर व अस्वच्छतेवर महापालिकेची कडक कारवाई!

## २१ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल

पिंपरी (दै. संध्या) :

सिंगल यूज प्लास्टिकचा वाढता वापर पर्यावरणासाठी गंभीर धोका ठरत असून, वारंवार सूचना देऊनही नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पिंपरी चिंचवड महापालिकेकडून कडक कारवाई सुरू करण्यात आली आहे. या अनुषंगाने महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पथकाने ब क्षेत्रीय कार्यालय, प्रभाग क्रमांक १७ अंतर्गत विविध ठिकाणी कारवाई करीत २१ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल केला आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आणि सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिकचा वापर करणाऱ्यांवर कडक मोहीम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने आरोग्य विभागाच्या ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक १७ येथे सार्वजनिक ठिकाणी बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर करणारे तसेच अस्वच्छता पसरविणारे



नागरिक आणि व्यावसायिकांवर कठोर कारवाई करण्यात आली. प्लास्टिकचा वापर, सार्वजनिक ठिकाणी घाण करणे व थुंकणे या प्रकारांबाबत दंड आकारण्यात आला. या कारवाईमध्ये ५ हजार रुपयांची ३ प्रकरणे, २ हजार रुपयांचे १ प्रकरण, १ हजार रुपयांची ४ प्रकरणे आणि ५०० रुपयांचे १ प्रकरण अशा एकूण ९ प्रकरणांमध्ये एकूण २१ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. सहाय्यक आरोग्य अधिकारी सुधीर वाघमारे यांच्या अधिपत्याखाली आरोग्य निरीक्षक रुपाली साळवे यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी सातत्याने अशी कारवाई सुरू राहणार असून नागरिकांनी सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळावा व स्वच्छता नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

> वसुंधरेचे संरक्षण आणि शहराची स्वच्छता ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. सिंगल यूज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळणे आवश्यक असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर महापालिकेकडून यापुढेही कडक कारवाई केली जाईल. नागरिकांनी स्वच्छता नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे.
> **- डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

# महापालिकेवर आर्थिक भुर्दंड टाकणाऱ्या CIEL संस्थेचे कंत्राट रद्द करा

## शिवसेना नगरसेविका ऐश्वर्या तरस यांची महापौरांकडे मागणी

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड महापालिकेवर आर्थिक भुर्दंड टाकणारे, अधिकाऱ्यांच्या अधिकारांवर गदा आणणारे तसेच ठेकेदारांसाठी त्रासदायक ठरत असलेल्या CIEL या त्रयस्थ संस्थेचे कंत्राट तात्काळ रद्द करण्यात यावे, अशी मागणी शिवसेना नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी महापौर रवी लांडगे यांच्याकडे केली आहे. प्रशासक कालावधीत तत्कालीन आयुक्तांनी कामाचा दर्जा राखण्याच्या नावाखाली महसुली व भांडवली कामांच्या देयकांची तपासणी करण्यासाठी CIEL या खासगी संस्थेची नियुक्ती केली



होती. मात्र या नियुक्तीबाबत अनेक गंभीर आक्षेप उपस्थित होत आहेत. नगरसेविका ऐश्वर्या तरस यांच्यावतीने मावळ लोकसभा युवासेना प्रमुख राजेंद्र तरस यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, शासकीय अधिकारी व अभियंत्यांच्या कामांवर देखरेख ठेवण्यासाठी कोणताही स्पष्ट शासकीय नियम नसताना खासगी त्रयस्थ संस्था नेमण्यात आली.

# पिंपरी चिंचवड मनपा शाळांमध्ये कचरा विलगीकरणाचे धडे

*शालेय स्तरावर वसुंधरापूरक सवयींची जडणघडण; ओला-सुका कचरा वर्गीकरणासह होम कंपोस्टिंगचे प्रात्यक्षिक*

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने शहरात कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविले जात असून मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांना कचरा विलगीकरणाचे प्रत्यक्ष धडे दिले जात आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवि लांडगे, उप महापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त डॉ.प्रदीप ठेंगल, सहा.आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये ओला, सुका, घरगुती घातक आणि सॅनिटरी कचरा अशा चार प्रकारांमध्ये कचरा वेगळा करण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

भविष्यात जबाबदार आणि वसुंधरेबाबत जागरूक नागरिक घडवण्यासाठी शालेय स्तरावरच योग्य सवयी रुजवणे गरजेचे आहे. याच उद्देशाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून मनपा शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून कचरा विलगीकरण आणि होम कंपोस्टिंग प्रक्रियेबाबत माहिती देण्यात येत आहे.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व समजावून सांगितले जात असून शाळा परिसर स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ठेवण्यावर भर दिला जात आहे. तसेच 'झिरो वेस्ट स्कूल' ही अभिनव संकल्पना राबवून शाळांमधील कचरा कमी करण्याचा आणि त्याचा योग्य प्रकारे पुनर्वापर करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, वसुंधरा संरक्षण आणि कचरा व्यवस्थापनाबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण होत असून भविष्यात हे विद्यार्थी समाजातही कचरा विलगीकरणाचा संदेश पोहोचवतील, असा विश्वास आरोग्य विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

> स्वच्छ शहर घडवण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. मनपा शाळांमधून 'झिरो वेस्ट स्कूल' सारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना कचरा व्यवस्थापनाचे धडे दिले जात आहेत, ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. विद्यार्थीच पुढे जाऊन समाजात स्वच्छतेचा संदेश पोहोचवतील.
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
>
> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये कचरा विलगीकरण आणि वसुंधरा संवर्धनाच्या सवयी रुजवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थी जर लहानपणापासून या गोष्टी शिकले, तर भविष्यात शहर अधिक स्वच्छ आणि पर्यावरणपूरक होण्यासाठी मोठी मदत होईल.
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

# 'देश भगत युनिव्हर्सिटी'कडून आंतरराष्ट्रीय वैद्यकीय अभ्यासक्रम लॉन्च

पिंपरी (दै. संध्या) :

भारतीय विद्यार्थ्यांना परदेशात, विशेषतः अमेरिकेत वैद्यकीय क्षेत्रात उज्ज्वल करिअर करण्यासाठी मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'देश भगत युनिव्हर्सिटी (DBU) अमेरिका'तर्फे नवीन आंतरराष्ट्रीय वैद्यकीय अभ्यासक्रम लॉन्च करण्यात आले आहेत. पुण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत तसेच आकुर्डी येथे आयोजित "Growth Strategy Meet 2026" या कार्यक्रमात या उपक्रमाची सविस्तर माहिती देण्यात आली.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. हर्ष सदावर्ती आणि ऑपरेशन्स डायरेक्टर अरुण मलिक यांनी या अभ्यासक्रमाच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकताना सांगितले की, भारतातील मर्यादित व महागड्या एमबीबीएस शिक्षणाला पर्याय म्हणून हा जागतिक दर्जाचा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी




ठरणार आहे. या नव्या उपक्रमांतर्गत ४ वर्षांचा आणि ५ वर्षांचा 'एमडी' (MD) प्रोग्राम उपलब्ध असून, तो भारतातील 'एमबीबीएस' (MBBS) पदवीच्या समकक्ष मानला जातो. विशेष म्हणजे, भारतातील खासगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या तुलनेत हा अभ्यासक्रम अत्यंत परवडणाऱ्या शुल्कात उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची आंतरराष्ट्रीय मान्यता. विद्यार्थ्यांना अमेरिकेतील USMLE, तसेच यूके आणि कॅनडा येथील वैद्यकीय परवाना परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर डॉक्टर म्हणून करिअर घडवण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

अभ्यासक्रमाची रचना ही तीन वर्षांच्या सैद्धांतिक शिक्षणासोबत दोन वर्षांच्या क्लिनिकल रोटेशनवर आधारित असून, विद्यार्थ्यांना जगभरातील विविध रुग्णालयांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे त्यांना व्यावहारिक अनुभवासोबतच आंतरराष्ट्रीय आरोग्य व्यवस्थेची ओळख होणार आहे.


प्रवेशासाठी १०+२ सायन्स शाखा पूर्ण केलेले आणि 'नीट' (NEET) परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी पात्र असतील. याशिवाय, 'D-Best Global MD' या विद्यापीठाच्या स्वतंत्र प्रवेश परीक्षेद्वारे विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली जाणार आहे.

दरम्यान, १८ मार्च २०२६ रोजी आकुर्डी येथील ग्रँड Exotica येथे आयोजित "Growth Strategy Meet 2026" कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात उपकुलगुरू डॉ. हर्ष सदाबर्ती यांनी भारतीय विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक बनवण्यासाठी अशा अभ्यासक्रमांची गरज अधोरेखित केली. यावेळी व्यासपीठावर प्रेसिडेंट 2ओएसडी अमित कुकरेजा, MBBS डायरेक्टर अरुण मलीक, मृत्युंजय हिरेमठ, बबिता सिरस्वा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच सीनियर मार्केटिंग मॅनेजर दिनेश सिंह, कार्यक्रम आयोजक सिंटू सिंग आणि करिअर क्राफ्ट एज्युकेशनल सर्व्हिसच्या मुख्य कार्यकारी अधिकारी बबिता सिरस्वा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात संस्थेच्या भविष्यातील विस्तार योजना, आंतरराष्ट्रीय सहकार्य, संशोधनाच्या संधी आणि जागतिक दर्जाच्या शिक्षण प्रणालीवर सखोल चर्चा करण्यात आली. विशेषतः School of Medicine अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या MD (MBBS) कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना अमेरिका, यूके आणि इतर देशांमध्ये करिअर करण्याचे दरवाजे खुले होत असल्याचे अधोरेखित करण्यात आले. "भारतात एमबीबीएसच्या जागा मर्यादित आणि खर्चिक आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे, यासाठी सेंट व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्स येथील कॅम्पसमध्ये हे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत," असे डॉ. हर्ष सदावर्ती यांनी स्पष्ट केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ पदवीच नव्हे, तर जागतिक स्तरावर करिअर घडवण्याची संधी मिळणार असून, शैक्षणिक क्षेत्रात नवी दिशा निर्माण होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक नीता यादवाड यांनी प्रभावीपणे पार पाडले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### खंडागळे राम मंदिरात रामनवमी उत्सव सुरु

जेजुरी (दैनिक संध्या) : सरदार खंडागळे घराण्याचा मानबिंदू असलेल्या जेजुरी येथील राम मंदिरामध्ये श्री राम नवमी उत्सव प्रतिपदा पासून गुडी पाडव्या हा कीर्तन महोत्सव पासुन सुरु झाला. पहिल्या दिवशी सौ नीलम प्रसाद खंडागळे यांनी नामस्मरणाचे महत्व अणि संत जनाबाई हिचे चरित्र सांगितले. वारकरी संप्रदायातील जेष्ठ कीर्तन व प्रवचनकार ह भ प नारायण महाराज गोसावी या प्रसंगी उपस्थित होते. या कीर्तन महोत्सवास सौ नीता गोसावी यांनी हार्मोनियम साथ केली. उपस्थित सर्व श्रोत्यांनी या वेळी उत्कृष्ट कीर्तन सेवा केल्या बद्दल कौतुक केले. राम नवमी पर्यंत रोज सायंकाळी वारकरी , नारदीय कीर्तन होणार आहेत. स्वप्निल काळाने महाराज,सयाजी म्होरकर,प्रेमा कुळकर्णी, शैलजा खाडे, पूर्णा परांजपे यांची कीर्तने होणार आहेत. रोज महाप्रसादाचे वाटप होत असून. राम नवमी दिवशी कै सुधाकर वामन खंडागळे अध्यासन तर्फे पुरस्कार वितरण होणार असल्याची माहिती आयोजक डॉ प्रसाद खंडागळे यांनी दिली.

### बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा आढावा : निरीक्षकांची बैठक

बारामती (दैनिक संध्या) : उपमुख्यमंत्री कै.अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदार संघाची पोटनिवडणूक दि. २३ एप्रिल २०२६ रोजी होणार असून त्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून नियुक्त करण्यात आलेल्या जनरल निरीक्षक, पोलीस निरीक्षक आणि खर्च निरीक्षक यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे बैठक घेऊन निवडणुकीच्या तयारीचा सखोल आढावा घेतला. या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांकडून निवडणुकीची पूर्वतयारी, कायदा व सुव्यवस्था, भरारी पथक (FST) व स्थिर देखरेख पथक (SST) यांचे नियोजन, तसेच आचारसंहितेची अंमलबजावणी या विविध बाबींचा तपशीलवार आढावा घेण्यात आला. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष आणि शांततेत पार पडावी यासाठी आवश्यक त्या सूचनाही देण्यात आल्या. भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निरीक्षक पुढीलप्रमाणे आहेत. जनरल निरीक्षक श्री. सुनिल कुमार वर्मा (IAS) – ७६६६६३९८५९, खर्च निरीक्षक श्री. बनोथ अखिल राम नाईक (IRS) – ७६६६६२८९८६ आणि पोलीस निवडणूक निरीक्षक श्री. एन. कोलंची (IPS) – ९५७९२३८७३०. हे तिन्ही निरीक्षक बारामती येथील विश्रामगृहात मुक्कामी आहेत. बारामती विधानसभा मतदार संघातील नागरिकांनी निवडणुकीसंदर्भात काही तक्रारी किंवा सूचना असल्यास संबंधित निरीक्षकांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. जितेंद्र डूडी यांनी केले आहे.

### उंब्रज गावच्या वृषाली राजेंद्र राऊत हिची इटलीत पीएचडीसाठी निवड

नारायणगाव (दैनिक संध्या) : उंब्रज नं. 1.(जुन्नर ) येथील वृषाली राजेंद्र राऊत हीची इटलीतील प्रतिष्ठित मिलानो -बिकोका विद्यापीठात पीएचडी संशोधनासाठी निवड झाली आहे. तिने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून भौतिकशास्त्र विषयात पदव्यूत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थीनिने आपल्या मेहनतीच्या जोरावर परदेशातील प्रतिष्ठित विद्यापीठात स्थान मिळवल्याने उंब्रज गावासह जुन्नर तालुक्याचा गौरव झाला आहे.

### विकास कामांच्या उद्धाटनासह तमाशा पंढरीत तीन कोटींची उलाढाल

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथे गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मीना नदीकाठी 80 लाख रुपयांचे रिटेनिंग वॉल तसेच शौचालयाच्या 40 लाख रुपयांच्या कामाचे उद्‌घाटन संपन्न झाले. श्री गणेशा कॅफे, भारत महाईसेवा केंद्र आणि नारायणगावच्या आरोग्यसेवेत एक महत्वपूर्ण टप्पा गाठलेल्या 110 बेडची सुसज्ज क्षमता, आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान,आणि रुग्णकेंद्रित सुविधा असलेल्या मते हॉस्पिटलच्या अत्याधुनिक नूतन वास्तूचे उद्‌घाटनही करण्यात आले. उद्‌घाटनप्रसंगी बोलताना नारायणगाव आणि परिसरातील भटक्या पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी मार्ग काढू अशा प्रकारची भावना उपसरपंच बाबू पाटे व संतोषनाना खैरे यांनी व्यक्त केली. तसेच उत्तर पुणे जिल्ह्यातील तमाशा पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नारायणगाव येथील स्व. विठाबाई नारायणगावकर तमाशा पंढरीत यावर्षी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर 32 फडमालकांनी एकाच दिवसात 150 हून अधिक तमाशांचे करार केले असून, यातून तब्बल 3 कोटींची उलाढाल झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरवर्षी पाडव्याच्या मुहूर्तावर तमाशा करार हे मोठ्या प्रमाणात होत असतात. या तमाशा पंढरीला ग्रामपंचायत नारायणगाव मोठ्या प्रमाणावर वीज, व पाण्याची व्यवस्था करत असते.त्याप्रमाणे यावर्षी फेब्रुवारी ते गुढीपाडवा या कालावधीत तमाशा पंढरीत 600 सुपाऱ्या जाऊन अंदाजे दहा कोटी रूपयांचे बुकिंग झाले आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून गावागावातील सरपंच,यात्रा समिती सदस्य गाव कारभारी आणि पुढारी नारायणगाव येथे तमाशा ठरवण्यासाठी दाखल झाले होते. त्यामुळे परिसराला जत्रेचे स्वरूप आले होते.

### अग्निमुक्त वन दिनानिमित्त शिरूर रामलिंग मध्ये शपथ विधी कार्यक्रमाचे आयोजन




कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यातील वनपरिक्षेत्रात अग्निमुक्त वन दिनानिमित्त जनजागृतीसाठी विशेष शपथ विधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २१ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ वाजता श्री. रामलिंग देवस्थान सभागृह, शिरूर येथे हा कार्यक्रम पार पडणार आहे.या कार्यक्रमासाठी वन अधिकारी व कर्मचारी यांच्यासह गावातील ग्रामस्थ, ग्रामपंचायत पदाधिकारी, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे सदस्य, लोकप्रतिनिधी, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष व सदस्य तसेच पोलीस पाटील यांना उपस्थित राहण्याचे आवाहन शिरूर वन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. वन हे पाणी, माती, हवामान आणि वन्यजीवांचे संरक्षण करणारे महत्त्वाचे साधन असून, त्यावर अनेकांच्या जीवनाचा आधार आहे. मात्र वन वणव्यामुळे काही क्षणांत मोठ्या प्रमाणावर हानी होऊ शकते. त्यामुळे हा शपथ विधी केवळ औपचारिक न राहता, वनसंवर्धनासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देणारा ठरावा,असा उद्देश या उपक्रमामागे आहे.ग्रामस्थांमध्ये जनजागृती निर्माण करून वन वणवे रोखण्यासाठी प्रत्येकाने स्वतः पुढाकार घेऊन इतरांनाही प्रोत्साहित करावे, असे आवाहन शिरूर वन परिमंडळ अधिकारी भानुदास शिंदे यांनी केले आहे. तसेच सर्वांनी कार्यक्रमास उपस्थित राहून आपली जबाबदारी पार पाडावी, असेही त्यांनी नमूद केले आहे.

# स्मार्ट मीटर न बसविण्याबाबत महावितरणला निवेदन

**नारायणगाव (दै. संध्या)**



स्वाभिमानी शेतकरी संघटना ग्राहक कल्याण फाउंडेशनच्या वतीने स्मार्ट मीटर बसून घ्यायला संपूर्ण नकार व सध्याचे पोस्टपेड मीटर व जोडणी आहे तसेच चालू ठेवणे याबाबत मंचर येथील महावितरण कंपनी कार्यकारी अभियंता राहुल गवारी व महावितरण कंपनी नारायणगाव विभाग कार्यालयाचे उपकार्यकारी अभियंता अनिल मुर्दनगैवडा यांच्याकडे निवेदन देण्यात आले आहे. हे निवेदन जुन्नर ग्राहक कल्याण फाउंडेशनचे अध्यक्ष के. डी. सरोदे,जयेश खांडगे तालुकाध्यक्ष जुन्नर द युवा पत्रकार संघ,प्रमोद खांडगे पाटील प्रभारी तालुकाध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना जुन्नर तालुका यांनी केली.

या निवेदनात म्हटले आहे की,

१) महावितरण कंपनीने त्याच्या MOM मध्ये ग्राहकांचा मीटर बदलण्यात घेतलेला तथाकथित एकतर्फी असून घटनेने वीज कायद्याने आणि ग्राहक संरक्षण कायद्याने दिलेल्या ग्राहकांच्या मूलभूत हक्क अधिकार संरक्षणाचे सरळ सरळ उल्लंघन करणारा आहे वीज कायद्यातील कलम 47 च्या पाच नुसार मीटर बाबत कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार फक्त आणि फक्त ग्राहकाचाच आहे.

२) विज्ञान मग आयोगाचे स्मार्ट मीटर प्रीपेड मीटर च्या संदर्भात आलेली २०२४ सालची नियमावली आणि माननीय कर्नाटक उच्च न्यायालयाने कोणत्याही ग्राहकाला परवानगी शिवाय स्मार्ट मीटर लावता येणार नाही. असा दिनांक 25 एप्रिल 2025 रोजी आदेश पारित केला आहे. (संदर्भ cose no:wp 12535/ 2025jayalakshmi/ M AND State of Karnataka and Others). त्या आदेशाला कोणत्याही वरिष्ठ कोर्टाने स्थगिती आदेश दिलेला नाही.

३) त्याचबरोबर ग्राहक संरक्षण कायदा २०१९ मधील कलम दोन उपकलम नऊ चा देखील जाणीवपूर्वक भंग ठरते ग्राहक हक्कामध्ये वस्तू उत्पादने किंवा सेवांची गुणवत्ता शुद्धता मानक आणि किंमत याबद्दल माहिती मिळवणे चा अधिकार आहे.

४) ग्राहक संरक्षण कायद्यातील उपरोक्त तरतुदी लक्षात घेता माननीय कर्नाटक उच्च न्यायालयाने दिनांक 25 4 2025 रोजी उपरोक्त विषयी पारित केलेला अंतरिम आदेशाचा आधार केवळ विज्ञान आयोगाच्या सर्व विविध वितरण कंपन्यांना जारी केलेल्या नियमावलीत इथपर्यंत मर्यादित नसून त्याचा थेट संदर्भ ग्राहक संरक्षण कायदा 2019 आणि त्यातील उपरोक्त तरतुदींचा देखील आहे त्यामुळे कोणत्याही विविध वितरण कंपनीने त्याचा कायमस्वरूपी वीज पुरवठा असणाऱ्या कोणत्याही ग्राहकावर स्मार्ट मीटर बसवण्याचे बाबतीत एकतर्फी आणि मनमानी प्रशासकीय कारवाई करू शकत नाही.

५) महावितरण कंपनीने मंजूर केलेल्या टेंडर नुसार 12000 प्रति मीटर प्रमाणे आहे. या खर्चाच्या वीज दरामध्ये वाढ होणार आहे. आम्ही हा मीटर वापरणार नसल्यामुळे या वाढदिवसाचा बोजा आमच्यावर लावता येणार नाही.

६) त्यामुळे काम करो से कायदा या उपक्रमाने महावितरण कंपनीने जबरदस्तीने किंवा त्यांच्या एअर कंडिशन ऑफिस हजारो रुपयांच्या गुबगुबीत खुर्चीत बसून ग्राहकांचा कसलाही विचार न करता वरिष्ठांनी घेतलेला तथाकथित एकतर्फी धोरणात्मक निर्णयाची भीती घालून ग्राहकांना नको असलेले नवीन स्मार्ट मीटर बसवायचा प्रयत्न केल्यास त्याला टोकाचा विरोध करून विविध शेतकरी संघटना व ग्राहक कल्याण माहिती अधिकार समिती पाडल्याशिवाय राहणार नाही. माहितीसाठी आमच्या अंतिम रंगीत बिलाची प्रत जोडत आहे.

कृपया वरील मागण्यांची नोंद घ्यावी आणि स्मार्ट मीटर बसवण्याबाबत पुढील कारवाई तातडीने जुन्नर तालुक्यात करण्यात यावी अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटना जुन्नर तालुका व ग्राहककल्याण फाउंडेशन जुन्नर तालुका यांच्या वतीने करण्यात आली.

यावेळी बाबाजीशेठ नेहरकर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, अमित डोंगरे सचिव स्वाभिमानी शेतकरी संघटना जुन्नर,वंदनाताई वाघचौरे कार्याध्यक्ष ग्राहक कल्याण फाउंडेशन,पल्लवीताई सरोदे पत्रकार, सोपान खांडगे व शेतकरी उपस्थित होते.

## आळंदी नगरपरिषदेकडून महिला बचत गटांना २८ लाखांचे कर्ज वाटप

**आळंदी (दै. संध्या)**




शहरातील महिला बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आळंदी नगर परिषदेकडून दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत एकूण २८ लाख रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले. या योजनेचा उद्देश शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना कौशल्य विकास, स्वयंरोजगार व उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे. या अंतर्गत विविध महिला बचत गटांना कर्ज देऊन त्यांना व्यवसाय उभारणीसाठी मदत करण्यात येत आहे.

या उपक्रमात अलंकापुरी, नवदुर्गा, तन्मय, तेजस्विनी, श्रीराम, शिवशक्ती आणि कुलस्वामिनी या बचत गटांना अनुक्रमे ३ ते ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज वितरित करण्यात आले. या कर्ज वाटपामुळे महिला बचत गटांना स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळणार आहे.

नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे म्हणाले, “महिला बचत गट हे शहराच्या आर्थिक प्रगतीचे मजबूत आधारस्तंभ आहेत. अशा योजनांमुळे महिलांना स्वावलंबी होण्यास मदत होते आणि स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मितीला चालना मिळते.”

मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सांगितले, “आळंदी नगर परिषद महिलांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असून, अंतर्गत विविध उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. भविष्यातही अशा योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येईल.” महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ऋतुजा तापकीर म्हणाल्या, “महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वावलंबनाची संधी मिळत असून, त्यांच्या कुटुंब व समाजाच्या विकासातही मोठा वाटा उचलला जात आहे.”

## चाकणसह उद्योग नगरीत गुढीपाडवा विविध उपक्रमांनी साजरा

**चाकण (दै. संध्या)**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला गुढीपाडवा सण चाकणसह उद्योग नगरीत मोठ्या दिमाखात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. गुढीपाडवा या सणाच्या पार्श्वभूमीवर मराठी नव वर्षाच्या स्वागतासाठी गेल्या आठ दिवसांपासून चाकण शहर सज्ज झाले होते. चाकण बाजारपेठेमध्ये खरेदीचा उत्साह शिगेला पोहोचला होता. रंगीबेरंगी गुढ्या, फुलांचे तोरण, साखरेच्या गाठी, कडुलिंबाची पाने, आकर्षक कलश आणि रेशमी कापडाने सजलेले स्टॉल्स ग्राहकांना आकर्षित करत होते. पारंपारिक खरेदीत महिलांकडून पैठणी, नऊवारी, सिल्क साड्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी होताना दिसत होती. पुरुषांनी कुर्ता, धोतर, फेटा बांधून या सणाचा आनंद लुटला.

चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक नितीन गोरे यांनी येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालय व आ.स्व. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठानच्या कार्यालयावर गुढी उभारली. प्रारंभी खेड तालुक्याचे आमदार स्व. सुरेश भाऊ गोरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून नितीन गोरे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी नगरसेवक प्रेम जगताप, उद्योजक निलेश गोरे, सुनील शेवकरी यांच्यासह शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. नितीन गोरे यांनी यावेळी सांगितले की, " गुढीपाडवा हा सण पर्यावरण पूरक साजरा झाला पाहिजे. अशा सणांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये संवाद साधण्यात निश्चित मदत होते.

## कबड्डी व खो-खो स्पर्धेत गीता डी. तटकरे यांनी मिळवले विजेतेपद




**नारायणगाव (दै. संध्या)**

जुन्नर तालुक्यातील बेल्हे येथील समर्थ पॉलिटेक्निक तसेच इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यामाने राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा 2025 -2026 समर्थ क्रीडा प्रबोधिनी येथे उत्साहात पार पडल्या. या कबड्डी स्पर्धेत 14 वयोगटातील 14 संघांनी सहभाग नोंदविला होता. कबड्डी स्पर्धेत गीता डी.तटकरे तंत्रनिकेतन (रायगड)यांनी विजेतेपद तर के.जे. सोमय्या तंत्रनिकेतन (मुंबई) यांनी उपविजेतेपद मिळवले. खो =खो स्पर्धेत 14 वयोगटातील 12 संघांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये श्रीमती गीता डी.तटकरे तंत्रनिकेतन (रायगड) यांनी विजेतेपद मिळविले तर कर्मयोगी तंत्रनिकेतन (पंढरपूर) यांनी उपविजेतेपद पटकावले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेळके, सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्य स्नेहल शेळके,प्राचार्य राजीव सावंत, प्राचार्य डॉ.अनिल कपिले,उपप्राचार्य संजय कंधारे,प्रा. प्रदीप गाडेकर,प्रा.हरिश्चंद्र नरसुडे तसेच विविध महाविद्यालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. संजय कंधारे,प्रा. ईश्वर कोरडे,डॉ. नंदकिशोर मुऱ्हेकर,, क्रीडा शिक्षक सुरेश काकडे, विनायक वऱ्हाडी यांनी विशेष परिश्रम घेतले. विजेते व उपविजेते खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

## शिरूर पश्चिम पट्ट्यात अवकाळी पावसाचा तडाखा; अनेक पिकांचे नुकसान

### महसूल, कृषी विभागाकडून पंचनामे वेगाने सुरू

**कवठे येमाई (दै. संध्या)**



शिरूर तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात विशेषतः कवठे येमाई च्या मुंजाळवाडी,ढगे माथा,येडे बोराडे वस्तीत काल गुरुवारी सायंकाळी चारच्या दरम्यान झालेल्या अवकाळी गारांसह पडलेल्या तुफानी पावसाने जोरदार हजेरी लावत शेतकऱ्यांच्या पिकांना मोठा फटका दिला आहे. कांदा,केळी ही शेतांमधील उभी पिके उध्वस्त झाल्याने शेतकरी चिंतेत सापडले आहेत.दरम्यान, महसूल,कृषी विभागाने तत्परता दाखवत नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे आज सकाळी सहा वाजताच सुरू केले आहेत. या विभागाचे कार्यतत्पर सहायक कृषी अधिकारी नंदू जाधव यांनी सकाळी सहा वाजताच प्रत्यक्ष कवठे येमाईत दाखल होत येडे बोऱ्हाडे वस्ती,टावरे वस्ती,मुंजाळवाडी परिसरात प्रत्यक्ष शेतात नुकसानीची पाहणी करून पंचनाम्याला सुरुवात केली आहे. आज दुपार पर्यंत सुमारे ९० पंचनामे पूर्ण करण्यात आल्याची माहिती जाधव यांनी दिली.या कामी स्थानिक ग्राम महसूल सहायक लहू सांडभोर यांची मोठी मदत होत आहे.जाधव यांनी सांगितले की, वादळी पावसामुळे अजूनही काही शेतकऱ्यांचे नुकसान झाले असण्याची शक्यता असून,अशा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करण्यात येणार आहेत. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी पुढे येऊन माहिती द्यावी,असे आवाहनही करण्यात आले आहे.

अवकाळी पावसाच्या या तडाख्यामुळे परिसरात विजेचे खांब उन्मळून पडले,काही ठिकाणी तारा ही तुटल्याने वीजपुरवठा ही विस्कळीत झाला होता. या अवकाळीत शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, शासनाकडून तातडीने मदत मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शिरूर तालुक्याच्या कवठे येमाई परिसरात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांना मोठा फटका बसला आहे. कर्ज काढून, मेहनत घेऊन उभी केलेली पिके या पावसामुळे अक्षरशः उद्‌ध्वस्त झाली असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.पिकांवर केलेला खर्च, घेतलेली कर्जे आणि त्याची परतफेड कशी करायची, असा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. “आता जगायचे कसे?” अशी हतबल भावना शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर युवा क्रांती फाउंडेशन राष्ट्रीय किसान विकास मंचचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुभाष शेटे यांनी शासनाकडे तातडीची मदत देण्याची मागणी केली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण होताच त्यांना त्वरित नुकसान भरपाई देण्यात यावी, असे त्यांनी आवाहन केले आहे. शासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# गरजू शाळांना मोफत डिजिटल इंटरॅक्टिव्ह स्क्रीन देणार - डॉ विशाल कडणे


### मुंबईतील गरजू शाळांना गूगल फॉर्म द्वारे नोंदणी करण्याचे आवाहन

**भिवंडी (दै. संध्या)**

शैक्षणिक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना संवादात्मक शिक्षणाची संधी देण्यासाठी शिक्षक नेते आणि मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाचे सर्वेसर्वा डॉ. विशाल कडणे यांनी गरजू शाळांना डिजिटल इंटरॅक्टिव्ह स्क्रीन उपलब्ध करून देण्याचा उपक्रम सुरू केला आहे.

शिक्षक नेते डॉ. विशाल कडणे हे शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांचा उपक्रम गरजू शाळांना आधुनिक डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्याचा आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना संवादात्मक आणि आकर्षक शिक्षण मिळते. सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून त्यांनी शिक्षणात डिजिटल क्रांती घडविण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे प्रत्येक शाळा स्मार्ट होऊन प्रत्येक विद्यार्थी सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त केला जातो.

डिजिटल इंटरॅक्टिव्ह स्क्रीन ही अशी सुविधा आहे ज्यामध्ये शिक्षक व विद्यार्थी थेट स्क्रीनवर लिहू शकतात, चित्रे दाखवू शकतात, तसेच त्वरित प्रतिसाद मिळवू शकतात. या तंत्रज्ञानामुळे शिक्षण अधिक आकर्षक, संवादात्मक आणि परिणामकारक होणार आहे. स्मार्ट क्लासरूम, प्रेझेंटेशन, टीमवर्क, तसेच मनोरंजन आणि व्यवसाय क्षेत्रातही या स्क्रीनचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे.



डॉ. कडणे यांनी सांगितले की, “शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक पद्धतीने शिकण्याची संधी मिळावी यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे. डिजिटल इंटरॅक्टिव्ह स्क्रीनमुळे शिक्षण अधिक सखोल आणि प्रभावी होईल.”

या उपक्रमांतर्गत मुंबईतील शाळांना गूगल फॉर्मद्वारे नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नोंदणी केलेल्या शाळांमधून निकष पास करणाऱ्या संस्थांची निवड करून डिजिटल इंटरॅक्टिव्ह स्क्रीन उपलब्ध करून दिली जाणार आहे. गुगल फॉर्म लिंक पुढील प्रमाणे आहे - https://forms.gle/UbxAykfyz8pH6nRx6

सदर नोंदणी हि फक्त संस्थेच्या अधिकृत मुख्याध्यापक अथवा संस्थाचालकांनीच अधिकृतरित्या करावी. शाळेची सविस्तर माहिती आणि डिजिटल इंटरॅक्टिव्ह स्क्रीनची गरज स्पष्ट करणारे निवेदन सोबत जोडावे. सदरील योजना फक्त मुंबई आणि आसपासच्या शाळांसाठीच असून नोंदणीचा अंतिम दिनांक २३.०३.२०२६ आहे. मोफत डिजिटल स्क्रीन साठी निवड झालेल्या शाळा / महाविद्यालयांना संपर्क करून २५ मार्च पूर्वी कळविण्यात येईल.

शाळांनी या संधीचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन डॉ. विशाल कडणे यांनी केले आहे.

# एसटीची आर्थिक घडी मजबूत करण्यासाठी बहुआयामी उपाययोजना

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक : केवळ डिझेल खरेदीतून वर्षाला २४१ कोटी रुपयांची बचत

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) आर्थिक स्थिती सक्षम करण्यासाठी पर्यायी उत्पन्न स्रोत निर्माण करण्याबरोबरच खर्च नियंत्रणासाठी ठोस व दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतले जात असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. डिझेल खरेदीची निविदा प्रक्रिया कोणताही हस्तक्षेप न सहन करता पारदर्शक पद्धतीने राबविल्यामुळे केवळ डिझेल खरेदीतून दरवर्षी सुमारे २४१ कोटी रुपयांची बचत होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



मंत्री सरनाईक म्हणाले की, सध्या एसटी महामंडळावर सुमारे १२ हजार कोटी रुपयांचा संचित तोटा आहे. चालू आर्थिक वर्षातही फेब्रुवारी २०२६ अखेर सुमारे ७५० कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. दररोज एसटीच्या उत्पन्नापेक्षा १ ते २ कोटी रुपये अधिक खर्च होत असल्याने केवळ तिकीट विक्रीवर अवलंबून राहणे शक्य नाही. त्यामुळे पर्यायी उत्पन्न स्रोत निर्माण करणे ही काळाची गरज बनली आहे. चालू आर्थिक वर्षात डिझेल बचतीबरोबरच जाहिरातीतून सुमारे २५० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. डिझेल खरेदी प्रक्रियेविषयी माहिती देताना मंत्री सरनाईक म्हणाले की, यापूर्वी अनेक वर्षे ठराविक सवलतीवर डिझेल खरेदी केली जात होती. मात्र स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे अधिक सवलत मिळवण्याच्या उद्देशाने ही प्रक्रिया राबविण्यात आली. ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, नियमबद्ध आणि निष्पक्ष पद्धतीने पार पडली असून कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप सहन केला जाणार नाही, अशी आमची ठाम भूमिका होती. काही कंपन्यांनी माध्यमांद्वारे चुकीची माहिती पसरवून निविदा प्रक्रियेवर परिणाम करण्याचा प्रयत्न केला; मात्र असे प्रयत्न हाणून पाडण्यात आले. एका कंपनीने न्यायालयात धाव घेतली होती; मात्र न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिल्याने निविदा प्रक्रिया योग्य असल्याची पुष्टी मिळाली, असेही त्यांनी नमूद केले. सध्या एसटीला दररोज सुमारे १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता असून वर्षाकाठी सुमारे ४० कोटी लिटर डिझेल खरेदी केली जाते. यासाठी दरवर्षी सुमारे ३,४०० कोटी रुपये खर्च होतो. भविष्यात ८ हजार नवीन डिझेल बसेस ताफ्यात दाखल झाल्यानंतर हा खर्च सुमारे ४,७०० कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. यापूर्वी प्रति लिटर सुमारे २.७० रुपयांची सवलत मिळत होती, ती वाढवून ३ रुपये करण्यात आली होती. मात्र स्पर्धात्मक निविदेनंतर प्रति लिटर ५.१३ रुपयांची सवलत मिळाली असून ही सध्याच्या दरापेक्षा २.१३ रुपयांनी अधिक आहे. या निर्णयामुळे एसटी महामंडळाला दरवर्षी सुमारे २४० ते २४१ कोटी रुपयांची बचत अपेक्षित आहे.

एसटीच्या महसूलवाढीसाठी इंधन विक्री क्षेत्रातही महामंडळ प्रवेश करत आहे. डिझेल, पेट्रोल, सीएनजी, एलएनजी तसेच भविष्यात इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर १०० ते ११० ठिकाणी मल्टी-मोडल इंधन पंप उभारण्याची प्रक्रिया सुरू आहे. या उपक्रमातून दरवर्षी सुमारे १०० कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित आहे. धुळे येथे अशा प्रकारचा प्रकल्प आधीच कार्यान्वित करण्यात आला आहे. इंधन गळती रोखण्यासाठी तसेच इंधन भरण्यातील अनियमितता टाळण्यासाठी एसटीच्या प्रत्येक पंपावर इंधन टाकी व नोझलला कृत्रिम बुद्धिमत्ता (AI Technology) आधारित सेन्सर बसविण्यात येणार असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली. सध्याच्या पारंपरिक पद्धतीमुळे दर १०० लिटरमागे ४ ते ५ लिटर तुट होत असल्याची बाब समोर आल्याने ही उपाययोजना करण्यात येत आहे. जाहिरात महसूल वाढवण्यासाठीही मोठा निर्णय घेण्यात आला आहे. एसटीच्या २५१ आगारांद्वारे आणि ६०० हून अधिक बसस्थानकांद्वारे दररोज ५० ते ५५ लाख प्रवाशांपर्यंत पोहोचणाऱ्या या माध्यमाचा प्रभावी वापर करण्यात येणार आहे. बसेसच्या आतील व बाहेरील भाग, बसस्थानके तसेच परिसरात डिजिटल फलक, उद्घोषणा आदींच्या माध्यमातून जाहिरात करून पुढील ५ वर्षांत सुमारे २५० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. यापूर्वी हे उत्पन्न दरवर्षी केवळ २० ते २२ कोटी रुपये होते.

ऊर्जा बचतीसाठी एसटी महामंडळाने सौर रूफटॉप प्रकल्प हाती घेतला आहे. विविध आगार, बसस्थानके आणि कार्यशाळांच्या छतांवर सौर प्रकल्प उभारून वीज निर्मिती करण्यात येणार आहे. स्थानिक गरज भागवून उर्वरित वीज विक्रीतून दरवर्षी १० ते १५ कोटी रुपयांची बचत व उत्पन्न मिळणार आहे. तसेच एसटीच्या मोकळ्या जागेवर सौर शेतीद्वारे वीज निर्मिती करून ती महावितरण कंपनीला विकण्यात येणार असून त्यातून शाश्वत उत्पन्न निर्माण होईल. असे मंत्री सरनाईक म्हणाले.

"एसटीमध्ये आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि स्वावलंबन वाढवणे हे आमचे उद्दिष्ट आहे. पर्यायी उत्पन्न स्रोत निर्माण करून एसटीला सक्षम व टिकाऊ बनवण्याचा आमचा निर्धार आहे," असे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, पुढील आर्थिक वर्षात स्क्रॅपिंग प्रकल्प, चालक-वाहकांच्या ड्युटीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून अतिकालीन भत्त्यावर नियंत्रण, तसेच इतर उपाययोजना राबवून किमान ५०० कोटी रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### "स्वामी गुरुमाऊली" गाणं प्रदर्शित, अभिनेता सनी कांबळे यांचे दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण

मुंबई (दैनिक संध्या) : स्वामींचा महिमा अपरंपार आहे. स्वामींना मानणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे अनुभव वेगळे आहेत. अभिनेता सनी कांबळे आणि तेजस पानसरे यांनी टाइमलेस स्लेट्स नावाच प्रोडक्शन हाउस सुरू केल आहे. या बॅनर अंतर्गत गाणी, शॉर्ट फिल्म्स, फीचर फिल्म, ॲडस करण्याचा मानस आहे. अम्ही श्री स्वामी समर्थ प्रकट दिनाचं औचित्य साधत "स्वामी गुरुमाऊली" हे गाण नुकतच प्रदर्शित केल आहे. अभिनेता सनी कांबळे याने या गाण्याचं दिग्दर्शन केल आहे. या आधी त्यांनी विशू, एका ब्रेकअपची गोष्ट अशा अनेक मराठी चित्रपटांमध्ये काम केली आहेत. स्वामींचा संदेश तुमच्या आत्मविश्वासाला अजून बळ देत. स्वामींची महती सांगणार "स्वामी गुरुमाऊली" गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आल आहे. हे गाणं हृदयस्पर्शी, भावनिक, आणि प्रेरणादायी असून या गाण्यात अभिनेता प्रियेश चव्हाण सह रुहान गांगणे, साक्षी मोरे, पद्मश्री उपळे, अनिकेत ढोले, मानसी अडगळे, श्रीषा घुबडे, रोहन कुलकर्णी, सारिका देशमुख यांनी प्रमुख भूमिका साकारली आहे. हे गाण ऋषभ साठे, शीतल गद्रे, बालगायक मल्हार यांनी गायल आहे. या गाण्याचे संगीत प्रज्वल यादव यांनी केले आहे. या गाण्याची कथा, पटकथा व दिग्दर्शन सनी कांबळे यांनी केलं आहे. या गाण्याची निर्मिती तेजस पानसरे आणि सनी कांबळे यांनी केली आहे. या गाण्याचे छायाचित्रण रोहित जेंकेवाड यांनी केले आहे. अभिनेता सनी कांबळे गाण्याच्या प्रोसेसविषयी सांगतात. "जेव्हा मी हे रेकॉर्ड लेबल सुरू करायचं ठरवलं तेव्हा सुरुवात स्वामींच्या गाण्यापासून करायचं ठरवलं. मी आणि माझा मित्र तेजस पानसरे आम्ही या गाण्याची निर्मिती केली आहे. या चार महिन्यांच्या प्रवासात माझ्या सोबत प्रितम कांबळे यांनी मनापासून काम केले आहे. यांची साथ लाभली नसती तर हे गाण पूर्णत्वाला गेल नसत. संगीतकार प्रज्वल यादव आणि एडिटर विनय शिंदे यांनी तर या गाण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली आहे. माझ्या अपेक्षेपेक्षा सुंदर असा टीज़र आणि गाण तयार झाल. या गाण्याचा टीज़र जेव्हा आम्ही एडिट करत होतो. तेव्हा टीजर मधली वाक्य खरी वाटत होती. (आयुष्य जेव्हा आपल्याला गुडघ्यावर बसवत. तेव्हा तिथूनच उभ राहण्याची ताकद ही मिळते. राग मनात ठेवला की तो आपल्यालाच चारतो. पण श्रद्धा आणि संयम माणसाला नव्याने घडवतात. देवावर रुसण्यापेक्षा स्वतःकडे पाहील तर कदाचित उत्तर सापडेल. जगाला दोष देण सोप्प असत. पण जगाकडे प्रेमाने पाहिलं. तर ते वेगळच दिसत. संकट येतात म्हणजे देव दूर गेला अस नसत. कदाचित तो आपल्याला मजबूत बनवत असतो.) या गाण्याच्या टीजरला सोशल मीडियावर खुप चांगला प्रतिसाद मिळाला."

### सेटवर सुरु झालेली कथा, अस्तित्वात उतरेल का ? मोहिनी - प्रेमाची फिल्मी कहाणी



मुंबई (दैनिक संध्या) : चंदेरी दुनियेचं आकर्षण, सोन्याच्या पडद्याची जादू... याला भुरळ पडत नाही असा कोणीच नाही. आजवर अनेक प्रेमकथा पाहिल्या आपण, पण ही प्रेमकथा आहे थोडी वेगळी कारण ही आहे अशा दोन व्यक्तींची कथा, ज्यांच्या आयुष्यात प्रेमापेक्षा स्वाभिमान आणि अहंकार आधी येतात. मनोरंजन सृष्टीचा झगमगाट, चाहत्यांची वेडी गर्दी आणि स्टारडमचा दिमाख... या सगळ्यांच्या मागे दडलेला संघर्ष, स्वप्नं आणि भावनांचा गुंता आणि त्यातून उलगडणारी RK आणि मोहिनीची प्रेमकथा, नवी मालिका 'मोहिनी – प्रेमाची फिल्मी कहाणी' आता प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. फिल्मी सेटवर जन्मलेली एक साधी मुलगी आणि त्याच जगावर राज्य करणारा सुपरस्टार... नियती, अहंकार आणि स्वाभिमान यांच्या संघर्षातून उभी राहणारी ही कथा प्रेक्षकांना एका भावनिक प्रवासावर घेऊन जाणार आहे. जगण्याने मोहिनीला खूप काही शिकवलं आहे ती एक लढवय्यी, संकटांना सामोरं जाणारी, बहुआयामी आणि अत्यंत स्ट्रीट-स्मार्ट स्त्री आहे. पडद्यामागच्या जगात वाढलेली ही मुलगी स्वतःच्या बळावर जगाला सामोरी जाते. जगण्यासाठी सुरू झालेला तिचा प्रवास पुढे जाऊन ताकद, प्रेम आणि स्वतःचं स्थान शोधण्याच्या प्रवासात बदलतो. मोहिनीचं एकच ध्येय आहे स्वतःचं आयुष्य सन्मानाने उभं करणं आणि तिच्या आईचा हरवलेला सन्मान व गौरव पुन्हा मिळवणं. आता मोहिनी हे सगळं कसं मिळवणार? कुठली संकटं तिच्या वाट्याला येणार? हे हळूहळू उलगडणार आहे. मालिकेत कलाकारांची भक्कम फळी पाहायला मिळणार आहे शालिनी (सोनाली पंडित नाईक), महेंद्र (शंतनू मोघे), ललिता (श्वेता मेहेंदळे),RK (समीर परांजपे), मोहिनी म्हणजेच अनघा ठाकूर आणि प्रताप (सुशील विश्वकर्मा) या महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. तेव्हा पाहा 'मोहिनी – प्रेमाची फिल्मी कहाणी', २३ मार्चपासून, संध्या ७.३० वा., फक्त कलर्स मराठीवर!

# पिंपळे सौदागरच्या विकासातील मोठा अडथळा दूर

## अनेक वर्षांपासून रखडलेल्या 'ट्रायोज-झूलेलाल टॉवर' रस्त्याचे काम अखेर सुरू!..

मुंबई (दै. संध्या)

■ नगरसेवक श्री शत्रुघ्न (बापू) काटे,नगरसेविका सौ. अनितताई काटे आणि नगरसेविका सौ.कुंदाताई भिसे यांच्या प्रदीर्घ पाठपुराव्याला यश; नागरिकांकडून समाधान

पिंपळे सौदागर परिसरातील वाहतुकीसाठी अत्यंत कळीचा मानला जाणारा, मात्र गेल्या अनेक वर्षांपासून विविध तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे प्रलंबित असलेला १८ मी. 'ट्रायोज-झूलेलाल टॉवर' रस्त्याचे कॉंक्रिटीकरण कामाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

नगरसेवक श्री. शत्रुघ्न (बापू) काटे,नगरसेविका सौ. अनिताताई काटे आणि नगरसेविका सौ.कुंदाताई भिसे यांच्या अथक परिश्रमातून आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या रस्त्याचे काम आज प्रत्यक्ष सुरू करण्यात आले.

पिंपळे सौदागरच्या मध्यवर्ती भागातून जाणारा हा रस्ता अनेक गृहप्रकल्पांना जोडणारा मुख्य दुवा आहे. मात्र, जमिनीचे अधिग्रहण, तांत्रिक त्रुटी आणि इतर काही कारणांमुळे या १८ मी रस्ता कॉंक्रिटीकरणाचे काम प्रलंबित होते.रस्ता अर्धवट असल्याने नागरिकांना धुळीचा त्रास आणि वाहतूक कोंडीचा मोठा सामना करावा लागत होता. ही समस्या सोडवण्यासाठी श्री शत्रुघ्न काटे यांनी महापालिका प्रशासनाकडे वारंवार बैठका घेतल्या आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून सर्व अडथळे दूर केले.

या कामाच्या सुरुवातीवर बोलताना श्री.शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले की, "निवडणूक दरम्यान ट्रायोज आणि झूलेलाल टॉवर्स सोसायटी रहिवासी आणि सौदागरच्या नागरिकांना दिलेला शब्द पूर्ण होताना पाहून आज मोठे समाधान वाटत आहे. 'ट्रायोज-झूलेलाल टॉवर' रस्ता हा केवळ सिमेंट-कॉंक्रीटचा रस्ता नसून तो या भागातील दळणवळणाची 'लाईफलाईन' आहे. अनेक तांत्रिक अडचणींमुळे हे काम रखडले होते, मात्र आम्ही कच खाल्ली नाही. प्रशासनाशी सतत संवाद साधून आणि पाठपुरावा करून आम्ही आज हे काम मार्गी लावले आहे. दर्जेदार आणि जलद गतीने हे काम पूर्ण करून हा रस्ता लवकरच नागरिकांच्या सेवेत दाखल होईल. विकासाचा हा रथ आम्ही असाच पुढे नेत राहू."

रस्त्याचे काम सुरू झाल्यामुळे स्थानिक सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांनी आणि रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. भाजप लोकप्रतिनिधींनी दाखवलेली ही 'राजकीय इच्छाशक्ती' पिंपळे सौदागरला अधिक 'स्मार्ट' बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.



यावेळी उद्योजक श्री संदिप काटे,उद्योजक श्री संजय भिसे, श्री धनंजय भिसे तसेच परिसरातील प्रतिष्ठित नागरिक आणि कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

# पिंपळे सौदागरातील शाळेविरोधात गंभीर तक्रार

पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

■ पत्रा शेडमधील असुरक्षित बांधकाम, अग्निसुरक्षा परवानग्यांशिवाय शाळा सुरू असल्याचा आरोप

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील क्विन्स पार्क, दीपमाळा सोसायटी, पिंपळे सौदागर येथील न्यू सिटी प्राईड इंग्लिश मीडियम स्कूलविरोधात गंभीर तक्रार दाखल करण्यात आली आहे. या शाळेचे संस्थापक अरुण चाबुकस्वार यांच्याविरोधात शाळा बेकायदेशीर, असुरक्षित आणि अग्निसुरक्षा परवानग्यांशिवाय चालविली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही तक्रार चिंचवड येथील नितीन सोनवणे यांनी शिक्षण विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका तसेच अग्निशमन विभागासह विविध संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी स्वरूपात केली आहे. या तक्रारीत शाळा पत्रा शेड व अपूर्ण भिंतींच्या तात्पुरत्या बांधकामात चालवली जात असल्याचा उल्लेख आहे. हे बांधकाम कोणत्याही अधिकृत मंजुरीशिवाय, अभियांत्रिकी तपासणीशिवाय आणि संरचनात्मक स्थैर्याच्या निकषांचे पालन न करता उभारण्यात आल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारदाराच्या मते, अशा प्रकारच्या पत्रा शेडमधील शाळेमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. उन्हाळ्यात असह्य उष्णता, पावसाळ्यात गळती, विजेच्या तारा ओलाव्यामुळे शॉर्टसर्किट होण्याचा धोका, तसेच वादळी वाऱ्यात पत्रे उडण्याची शक्यता यामुळे विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका पोहोचू शकतो, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याहून गंभीर बाब म्हणजे, संबंधित शाळेकडे फायर ऑडिट रिपोर्ट किंवा फायर एनओसी नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच शाळेत अग्निसुरक्षा साधनांचा अभाव, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग नसणे आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची उपलब्धता नसणे, या बाबी तक्रारीत अधोरेखित करण्यात आल्या आहेत.

# पूराच्या छायेतून सुरक्षिततेकडे... वाशिष्ठी तीराला संरक्षणाचे भक्कम कवच!

## *मतदारसंघाच्या विकासासाठी झटणारा हात : शेखर निकम म्हणजे जनतेचा विश्वास*

चिपळूण (दै. संध्या)

■ चिपळूण शहरातील वाशिष्ठी नदी तीरावरील वांगडे मोहल्ला पुरसंरक्षक भिंत बांधकामास तब्बल रू. २४ कोटी ९९ लाख निधी मंजूर



चिपळूण शहरातील वाशिष्ठी नदी तीरावरील वांगडे मोहल्ला परिसरासाठी अखेर दिलासा देणारा निर्णय झाला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पूराच्या विळख्यात सापडलेल्या या भागाला आता संरक्षणाचे भक्कम कवच मिळणार आहे. तब्बल रु. २४ कोटी ९९ लाख निधीसह पूर संरक्षक भिंत बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बहादुरशेख पुलापासून वांगडे मोहल्ला पर्यंतचा हा परिसर वाशिष्ठी नदीच्या काठावर वसलेला असून येथे मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे. विशेषतः दि. २२ व २३ जुलै २०२१ च्या भीषण पुरात या भागात मोठ्या प्रमाणात पाणी शिरले होते. घरांचे, मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले आणि नागरिकांना आर्थिक फटका बसला. नदीच्या पात्राची जास्त रुंदी आणि पाण्याचा वेग यामुळे काठालगतची जमीन सतत खचत असून घरांना धोका निर्माण झाला होता.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार शेखर निकम यांनी मागील तीन वर्षे सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला. नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत केलेल्या या प्रयत्नांना अखेर यश मिळाले आहे. क्षेत्रीय कार्यालयाने प्रत्यक्ष पाहणी करून तयार केलेल्या अंदाजपत्रकास शासनाने मंजुरी दिली असून, हा प्रकल्प कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांच्या अंतर्गत राबविण्यात येणार आहे.

या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत अप्पर मुख्य सचिव (जलसंपदा) दीपक कपूर, मुख्य अभियंता कपोले साहेब, तसेच कार्यकारी अभियंता गणेश सलगर आणि त्यांच्या संपूर्ण तांत्रिक पथकाने मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच अंदाजपत्रकाची अचूक मांडणी होऊन प्रकल्पाला गती मिळाली.

ही केवळ सुरुवात असून, पहिल्या टप्प्यातील या कामानंतर पेठमाप स्मशानभूमी ते होळी कट्टा तसेच फरशी पूल ते होळी कट्टा या भागांतील पूर संरक्षक भिंतींसाठीही जून-जुलैमध्ये मंजुरी मिळविण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

"बोले तैसा चाले, त्याची वंदावे पावले" याची प्रचिती देणारे काम आमदार शेखर निकम करत असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. पूरमुक्त चिपळूणच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

या कामस प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्याने मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, पालकमंत्री उदय सामंत, तसेच जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे आमदार शेखर निकम विशेष आभार व्यक्त केले आहेत. व सदैव चिपळूण पुरमुक्ती साठी पाठीशी असणारे दिवंगत आदरणीय अजितदादा पवार साहेब यांना त्रिवार अभिवादन केले आहे. वर्षानुवर्षे भीतीत जगणाऱ्या वाशिष्ठी काठावरील नागरिकांसाठी आता आशेचा किरण उजळला आहे.

हा फक्त भिंतीचा प्रकल्प नाही, तर सुरक्षित भविष्याचा भक्कम पाया आहे.

# गोदरेज एंटरप्राइजेस ग्रुपच्या ऊर्जा उपाय व्यवसायाला जोरदार मागणी

## ₹2,600 कोटींचे प्रकल्प प्रगतीपथावर; आर्थिक वर्ष 2027 मध्ये 15% वाढीचे ध्येय

मुंबई (दै. संध्या)

गोदरेज एंटरप्राइजेस समूहाच्या एनर्जी सोल्युशन्स व्यवसायाने आर्थिक वर्ष 2026 च्या अखेरीस 2,600 कोटी रुपयांचे प्रकल्प मिळवले आहेत. यामध्ये ट्रान्समिशन इन्फ्रास्ट्रक्चर, रेल्वे विद्युतीकरण आणि रिन्यूएबल ऊर्जा प्रकल्पांचा समावेश आहे. वीज पायाभूत सुविधा आणि स्वच्छ ऊर्जेमधील वाढत्या गुंतवणुकीच्या पाठबळावर, या व्यवसायात आर्थिक वर्ष 2027 पर्यंत सुमारे 15% वाढ होण्याची अपेक्षा आहे. ही वाढ म्हणजे ट्रान्समिशन इन्फ्रास्ट्रक्चर, ग्रीडचे आधुनिकीकरण आणि विद्युतीकरण प्रकल्पांसाठी असलेल्या वाढत्या मागणीचे प्रतिबिंब आहे. भारताची विस्तारित ऊर्जेची गरज भागवण्यासाठी असलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांसोबतच ही मागणी देशाची वीज परिसंस्था बळकट करण्याच्या सरकारच्या ध्येयाशी सुसंगत आहे. वाढीच्या गतीवर भाष्य करताना, गोदरेज एंटरप्रायझेस ग्रुपचे एनर्जी सोल्युशन्स बिझनेसचे प्रमुख श्री. राघवेंद्र मिर्जी म्हणतात, "ऊर्जा पायाभूत सुविधा मजबूत करण्यासोबत स्वच्छ ऊर्जा स्रोतांकडील संक्रमणाला गती देण्यावर भारताने लक्ष केंद्रित केल्यामुळे संपूर्ण ऊर्जा परिसंस्थेमध्ये अनेक महत्त्वपूर्ण संधी निर्माण होत आहेत. आमच्याकडील मजबूत ऑर्डर ही ट्रान्समिशन इन्फ्रास्ट्रक्चर, रेल्वे विद्युतीकरण आणि नवीकरणीय ऊर्जा उपायांसाठी असलेली वाढती मागणी दर्शवते. प्रमुख ऊर्जा आणि नवीकरणीय ऊर्जा बाजारपेठांमध्येही आम्ही आमचा विस्तार करत आहोत. यामध्ये गुजरात आणि राजस्थानसारख्या राज्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे, जिथे रिन्युएबल ऊर्जा क्षमतेत वेगाने वाढ होत आहे. तसेच महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि तामिळनाडूमधील वाढत्या औद्योगिक आणि शहरी मागणीमुळे ट्रान्समिशन पायाभूत सुविधा आणि ग्रीड आधुनिकीकरण क्षेत्रातील गुंतवणूक वाढते आहे. देशाच्या विकसित होत असलेल्या ऊर्जा क्षेत्राला आधार देणाऱ्या एकात्मिक, भविष्यासाठी सज्ज पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत." गेल्या वर्षभरात, कंपनीने संपूर्ण भारतात अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प राबवले; याद्वारे त्यांनी ट्रान्समिशन इन्फ्रास्ट्रक्चर, रेल्वे विद्युतीकरण आणि विकेंद्रित सौर ऊर्जा उपायांच्या क्षेत्रातील आपली क्षमता अधिक बळकट केली. यामध्ये गुजरातमध्ये 765kV क्षमतेच्या 25 युनिट AIS आणि GIS bays कार्यान्वित केले, विविध प्रदेशांमध्ये 400kV आणि त्यापेक्षा कमी क्षमतेच्या 54 युनिट AIS/ GIS bays कार्यान्वित केले, तसेच सिक्कीममध्ये 220/132kV क्षमतेचे AIS उपकेंद्र उभारले गेले. रेल्वे क्षेत्रातही, कंपनीने तीन रेल्वे ट्रॅक्शन उपकेंद्रे उभारून दिली, ज्यामुळे रेल्वे जाळ्याच्या विद्युतीकरणाच्या प्रक्रियेला हातभार लागला.

जयपूरमधील 6.5 मेगावॅट पीक क्षमतेच्या छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पासारख्या उपक्रमांद्वारे कंपनीने आपल्या नवीकरणीय ऊर्जा पोर्टफोलिओचा विस्तार केला आहे, जे व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांकडून सौर ऊर्जा उपायांचा वाढता स्वीकार दर्शवते. केंद्रीय अर्थसंकल्प 26-27 मध्ये म्हटल्याप्रमाणे, वीज पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर आणि स्वच्छ ऊर्जा संक्रमणाला गती देण्यावर भर असल्याने या कामाला आणखी बळ मिळाले आहे. या भागांमध्ये ट्रान्समिशन, उपकेंद्र आणि नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांची वाढती योजना असल्यामुळे, गोदरेजचा एनर्जी सोल्युशन्स व्यवसाय वीज कंपन्या तसेच औद्योगिक ग्राहकांना विश्वसनीय पायाभूत सुविधा पुरवतो आहेच. त्या सोबतच भारताच्या ऊर्जा संक्रमणाच्या पुढील टप्प्यात योगदान देण्यासाठी भक्कम स्थितीत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जेजुरीत श्री स्वामी समर्थांच्या मंदिरात प्रकटदिन साजरा

जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीतील श्री स्वामी समर्थ मंदिर व श्री स्वामी समर्थ मठात स्वामींचा प्रकटदिन विविध धार्मिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. जेजुरी नगरिमध्ये असणाऱ्या जोशी आळीतील श्री स्वामी समर्थ मंदिर तसेच जेजुरी गडाच्या पायथ्याशी व ऐतिहासिक होळकर तलावा काठी असणाऱ्या श्री स्वामी समर्थ मठात स्वामींच्या प्रकट दिनानिमित्त पहाटे रुद्रअभिषेक महापूजा, श्री स्वामी चरित्र सारामृत ग्रंथाचे सामूहिक पारायण, भजन, महाआरती, पालखी सोहळ्याची मंदिर प्रदक्षिणा, व महाप्रसाद अशा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री स्वामी मंदिरात श्री देशपांडे, तर श्री स्वामी मठात गणेश मोरे व स्वामी भक्तांनी या धार्मिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### पुणे शहरातील ईद-उत्सवादरम्यान वाहतूक व्यवस्थेत तात्पुरते बदल

पुणे (दैनिक संध्या) : दिनांक २० मार्च २०२६ किंवा २१मार्च २०२६ रोजी (चंद्र दर्शनानुसार) ईद निमित्त ईदगाह मैदान, गोळीबार मैदान चौक परिसरात सामुहिक नमाज पठण होणार आहे. त्यावेळी वाहनांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊ शकते, त्यामुळे वाहतूक पोलीसांनी तात्पुरती वाहतूक व्यवस्था राबविली जाईल. सकाळी ०६.०० ते ११.३० वाजेपर्यंत गोळीबार चौक परिसरातील सर्व वाहने आवश्यकतेनुसार पर्यायी मार्गे वळविण्यात येतील. जड वाहने: सोलापूर रोड, लुल्लानगर, खटाव बंगला मार्गे व इतर पर्यायी मार्ग वापरून प्रवास करतील; पुणे स्टेशनकडे जाणारी जड वाहने पूर्णतः बंद राहतील. हलकी वाहने: इम्प्रेस गार्डन रोड, बीशप स्कूल मार्गे इच्छित स्थळी जातील. मम्मादेवी चौक ते गोळीबार चौक, जुनी सोलापूर बाजार चौक ते गोळीबार चौक याठिकाणी वाहतूक पूर्णतः बंद राहणार आहे. शहरातील अन्य ईदगाह मैदानांवर होणाऱ्या नमाज पठणानुसार संबंधित भागातील वाहतूक परिस्थितीनुसार बंद अथवा पर्यायी मार्गे वळविली जाईल. वाहन चालकांनी वाहतूक पोलीसांचे मार्गदर्शन पाळून संभाव्य गैरसोय टाळावी असे आवाहन पोलीस उप-आयुक्त, वाहतूक पुणे शहर हिंमत जाधव यांनी केले आहे.

### चारचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी आगाऊ अर्ज व लिलाव प्रक्रिया

पुणे (दैनिक संध्या) : प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे चारचाकी वाहनांसाठी नवीन नोंदणी मालिका सुरू करण्यात येत आहे. नागरिकांची होणारी गर्दी व गैरसोय टाळण्यासाठी इच्छुक वाहनधारकांकडून आकर्षक (पसंतीचे) नोंदणी क्रमांक राखून ठेवण्यासाठी आगाऊ अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुकांनी दिनांक २४ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. अर्जासोबत डीडी (‘R.T.O., Pune’ नावाने), पत्त्याचा पुरावा व ओळखपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास संबंधित अर्जदारांची यादी नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. अशा अर्जदारांनी दिनांक २५ मार्च २०२६ रोजी दुपारी २.३० पर्यंत सीलबंद लिफाफ्यात वाढीव रकमेचा डीडी जमा करावा. त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता सहकार सभागृह, आरटीओ पुणे येथे लिलाव प्रक्रिया पार पडेल. सदर प्रक्रियेनुसार सर्वाधिक रक्कम देणाऱ्या अर्जदारास संबंधित पसंती क्रमांक देण्यात येईल. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार लागू शुल्क आकारण्यात येईल.

### सुट्टीतही पक्क्या अनुज्ञप्ती चाचण्या सुरु

पुणे (दैनिक संध्या) : दिनांक २१ मार्च २०२६ रोजी रमजान ईद निमित्त शासकीय सुट्टी जाहीर असली तरी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे पक्क्या अनुज्ञप्ती (Driving Licence) चाचण्यांचे कामकाज सुरू राहणार आहे. यापूर्वीच अर्जदारांनी अपॉइंटमेंट (slot) बुक केलेले असल्यामुळे त्यांना गैरसोय होऊ नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. ज्या अर्जदारांना २१ मार्च रोजी उपस्थित राहणे शक्य नसेल, त्यांनी शासकीय सुट्टी वगळता दिनांक २३ मार्च ते ३० मार्च २०२६ दरम्यान कोणत्याही दिवशी कार्यालयीन वेळेत चाचणीसाठी उपस्थित राहावे. यासाठी नवीन अपॉइंटमेंट घेण्याची आवश्यकता नसून, पूर्वीची अपॉइंटमेंट ग्राह्य धरली जाणार आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी केले आहे.

### विनापरवाना दारू विक्रेत्यांवर कारवाई

चाकण (दैनिक संध्या) : बेकायदेशीररीत्या दारू विक्री करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई आंबेठाण चौक, चाकण येथे मंगळवारी सायंकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. कृष्ण बहादूर सिंग (वय २७, रा. आंबेठाण चौक, चाकण.) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. पोलीस शिपाई निखिल बाळासाहेब वर्पे (वय ३३) यांनी याप्रकरणी बुधवारी (दि.१८) उत्तर चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. चाकण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री पावणे सात वाजण्याच्या सुमारास चाकण मधील आंबेठाण चौक येथे असलेल्या साई हॉटेल ॲण्ड चायनीस सेंटरमध्ये सिंग यांच्याकडे १७ हजार ५०० रुपयांची देशी, विदेशी दारू मिळून आली. सिंग हा दारू साठवून चाकण भागात विनापरवाना दारूची विक्री करत होता. चाकण पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

### कुरूळी येथील जुगार अड्ड्यावर छापा

चाकण (दैनिक संध्या) : जुगार अड्डयावर छापा टाकून चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई मंगळवारी रात्री साडे अकरा वाजण्याच्या सुमारास खेड तालुक्यातील कुरूळी येथे करण्यात आली. राजिक मेहबुब शेख (वय २९, रा. वेताळनगर, चिंचवड), सुरज नरेश कदम (वय ३२, रा. मातोश्री कॉलनी, डांगे चौक), आसिफ उस्मान तांबोळी (वय २८, रा. बोपोडी, पुणे) व गोविंद बाबुराव कांबळे (वय २९, रा. न-हेगाव, ता. हवेली, जि. पुणे) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. पोलीस शिपाई महेश नामदेव गायकवाड यांनी याप्रकरणी बुधवारी (दि.१८) दक्षिण महाळुंगे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. महाळुंगे इंगळे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा दाखल झालेले वरील चार जण आपसांत संगनमत करून खेड तालुक्यातील कुरूळी येथे तीन पत्तीवर पैसे लावून जुगार खेळत होते. पोलिसांनी अचानक छापा मारला असता त्यांच्याकडून रोख रक्कम व साहित्य असा एकूण ७४ हजार ५३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दक्षिण महाळुंगे इंगळे पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

# “मोफत पाणी वाटप” व “मोफत अँब्युलन्स सेवा” योजनेचे लोकार्पण

**माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते लोकार्पण**

जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील नागरिकांच्या मूलभूत गरजांचा विचार करून सामाजिक कार्यकर्ते नवनाथ चौंडकर यांच्या पुढाकारातून “मोफत पाणी वाटप” तसेच “मोफत अँब्युलन्स सेवा” या महत्त्वपूर्ण व लोकहितकारी उपक्रमांचा लोकार्पण सोहळा विद्यानगर, जेजुरी येथे पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी गटनेते सचिन सोनवणे, नगरसेवक गणेश डोंबे, भाजप शहराध्यक्ष सचिन पेशवे, माजी नगरसेवक बाळासाहेब दरेकर, अजिंक्य देशमुख,माजी नगरसेवक रवींद्र जोशी, सामाजिक कार्यकर्ते अनिल पोकळे, सदानाना बारसुडे, प्रसाद अत्रे, विशाल बारसुडे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, आणि जेजुरी शहर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाच्या माध्यमातून जेजुरी परिसरातील नागरिकांना शुद्ध, सुरक्षित व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्येत हा उपक्रम नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे. गरजू कुटुंबांना कोणताही आर्थिक भार न देता पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, तसेच आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत वैद्यकीय सेवा मिळावी या उद्देशाने “मोफत अँब्युलन्स सेवा” सुरू करण्यात आली असून ही सेवा २४ तास उपलब्ध राहणार आहे. अपघात, आजारपण किंवा अन्य आपत्कालीन प्रसंगी नागरिकांना त्वरित मदत मिळावी, हा या सेवेचा मुख्य हेतू आहे.असे नवनाथ चौंडकर यांनी सांगितले.



यावेळी बोलताना माजी आमदार संजय जगताप यांनी सांगितले की, समाजातील वंचित व गरजू घटकांपर्यंत मूलभूत सुविधा पोहोचवणे ही काळाची गरज आहे. शासनाच्या योजनांबरोबरच समाजातूनही अशा उपक्रमांची गरज आहे. “पाणी आणि आरोग्य या दोन अत्यंत महत्त्वाच्या बाबी असून, या उपक्रमामुळे दोन्ही क्षेत्रात सकारात्मक परिणाम दिसून येईल,” असे त्यांनी नमूद केले. तसेच, नागरिकांनी या सेवांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

## जिल्ह्यात दोन ठिकाणी सायन्स पार्क उभारणार; प्रयोगातून शिकण्याला चालना

नाझरे सुपे (दै. संध्या)

**योजनेचे नाव : सायन्स पार्क (योजना क्रमांक ०२)**

पुणे जिल्हा परिषदेच्या सन 2026-27 च्या अर्थसंकल्पातील लोककल्याणकारी योजना अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी आणि विज्ञान विषय अधिक रंजक व समजण्यास सोपा करण्यासाठी सायन्स पार्क उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. योजना क्रमांक ०२ अंतर्गत हा प्रकल्प राबविण्यात येणार असून, जिल्ह्यात दोन ठिकाणी हे सायन्स पार्क उभारले जाणार आहे.

सायन्स पार्क हे एक अनौपचारिक शिक्षण केंद्र म्हणून कार्य करणार आहे. येथे विद्यार्थ्यांना पुस्तकातील विज्ञान प्रत्यक्ष प्रयोगांच्या माध्यमातून समजावून सांगितले जाणार आहे. शालेय स्तरावर शिकवले जाणारे अनेक विज्ञान विषय विद्यार्थ्यांना अवघड वाटतात. ही अडचण दूर करण्यासाठी सायन्स पार्कमध्ये विविध प्रयोग, मॉडेल्स आणि प्रात्यक्षिकांच्या सहाय्याने शिक्षण दिले जाणार आहे.

या पार्कमध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांवर आधारित विविध मॉडेल्स उभारण्यात येतील. विद्यार्थ्यांना ऊर्जा, गती, रासायनिक अभिक्रिया, जैविक प्रक्रिया यांसारख्या संकल्पना प्रत्यक्ष पाहता आणि अनुभवता येतील. त्यामुळे त्यांच्या अभ्यासात रुची निर्माण होऊन समज अधिक दृढ होण्यास मदत होईल.

तसेच शाळांमधील क्लिष्ट विज्ञान संकल्पना सोप्या भाषेत आणि आकर्षक पद्धतीने मांडण्यासाठी विशेष विभाग तयार करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अवघड विषयही सहज समजतील. अंतराळ विज्ञानाबद्दल कुतूहल वाढवण्यासाठी सायन्स पार्कमध्ये अंतराळ विषयक माहिती व मॉडेल्सचा समावेश केला जाणार आहे. या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी तज्ज्ञ प्रशिक्षक व संबंधित संस्थांची नेमणूक केली जाणार आहे. हे प्रशिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांचे शंका निरसन करतील तसेच प्रयोगांच्या माध्यमातून शिकण्याची सवय विकसित करतील.

> “सायन्स पार्कमुळे विद्यार्थ्यांना विज्ञान प्रत्यक्ष अनुभवातून शिकता येईल. त्यामुळे त्यांच्या मनातील भीती दूर होऊन विज्ञान विषयाविषयी आवड आणि जिज्ञासा वाढेल.”

सायन्स पार्कमुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञान वाढणार नाही, तर त्यांच्यात वैज्ञानिक विचारसरणी, निरीक्षणशक्ती आणि नवोन्मेषी वृत्ती विकसित होण्यास मदत होणार आहे. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना समान शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

## निघोजे येथे ट्रकच्या धडकेत पादचारी ठार

चाकण (दै. संध्या)

भरधाव ट्रकची जोरदार धडक बसल्याने गंभीर जखमी झालेला पादचारी जागीच ठार झाला. खेड तालुक्यातील निघोजे येथे मंगळवारी (दि.१७) सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. महमद नौशाद इर्शाद (वय - ३०) असे या अपघातात ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे. महाळुंगे येथील पोलिसांनी (एमएच १२ एच डी ७३७२) या ट्रक वरील चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. धरजकुमार काशिनाथ राम (वय २७, सध्या रा. सारा सिटी, चाकण, मूळगाव बडकालाट, ता. बानपूर, जि. रोहतास, बिहार) यांनी याप्रकरणी दक्षिण महाळुंगे इंगळे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. महाळुंगे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महमद इर्शाद हा मंगळवारी निघोजे गावच्या हद्दीत रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न करत होता. त्यावेळी भरधाव आलेल्या ट्रकने त्यास पाठीमागून जोराची धडक दिली. त्यानंतर ट्रक त्याच्या पायावरून गेल्याने तो गंभीर जखमी होऊन ठार झाला. दक्षिण महाळुंगे इंगळे पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.



## आरोग्य तपासणी ही काळाची गरज - भाऊसाहेब भोईर

चाकण (दै. संध्या)

दृष्टी असेल तर सृष्टी दिसेल हे ब्रीद सत्यात उतरवण्यासाठी आरोग्य तपासणी करणे ही काळाची गरज असल्याचे मत भाऊसाहेब भोईर यांनी येथे व्यक्त केले. बालरंगभूमी परिषदेच्या वतीने चाकण येथील केअरवेल हॉस्पिटल मध्ये सभासदांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरात मार्गदर्शन करताना भोईर बोलत होते. या शिबिरामध्ये १०२ सभासदांच्या अत्यावश्यक सर्व तपासण्या मोफत करण्यात आल्या. नाक, कान, डोळे, घसा, ब्लड प्रेशर, शुगर, महिलांचे आजार व इसीजी आदी तपासण्या मोफत करण्यात आल्या. याप्रसंगी चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, डॉ. प्रदीप पाटील, डॉ. गोपाळ चौधरी, डॉ. सचिन निकम आदींसह बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा दिपाली शेळके, शंकर घोरपडे, नारायण करपे, अरुण पटवर्धन, विजयकुमार तांबे, संजय तांबे, हनुमंत कुबडे, नामदेव पडदुणे, मनोहरबापू शेवकरी आदी उपस्थित होते. विजयकुमार तांबे यांनी प्रास्ताविक केले. नारायण करपे यांनी सूत्रसंचालन केले. दिपाली शेळके यांनी आभार मानले.

## कॅपिटालँडने पुण्यातील होप स्कूल प्रोग्राम केला अधिक मजबूत

पुणे (दै. संध्या)

- १,४०० हून अधिक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून दिले
- पुण्यातील फेज २ च्या पूर्ततेसह होप स्कूल प्रोग्रामने भारतातील ३,००० हून अधिक मुलांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे

कॅपिटालँड होप फाउंडेशनने (सीएचएफ) या कॅपिटालँड ग्रुपच्या परोपकारी शाखेने आज पुण्यातील आपल्या होप स्कूल प्रोग्रामच्या फेज 2 च्या पूर्ततेची घोषणा केली. या विस्तारामुळे आता एकूण 1,400 हून अधिक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. कॅपिटालँड इन्व्हेस्टमेंट इंडियाचे अध्यक्ष श्री. किशोर मोरजानी, भोरवाडी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. नंदकुमार लक्ष्मण भोर आणि कॅपिटालँडच्या कर्मचारी स्वयंसेवकांच्या उपस्थितीत फेज 2 चे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. या टप्प्याच्या पूर्ततेमधून कॅपिटालँड कार्यरत असलेल्या समुदायांमधील गरजू मुलांच्या शिक्षणासाठी आणि कल्याणासाठी असलेली सीएचएफची कटिबद्धता दिसून येते.




या नवीन टप्प्यांतर्गत हिंजवडीतील भोरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत जवळपास 12,000 चौरस फूट क्षेत्रफळात 19 नवीन वर्गखोल्या बांधण्यात आल्या आहेत. 2023 मध्ये पूर्ण झालेल्या पहिल्या टप्प्यानंतर ही पुढील प्रगती आहे. पहिल्या टप्प्यात शाळेचे नूतनीकरण करून नवीन वर्गखोल्या आणि स्वच्छतागृहे बांधण्यात आली होती, तसेच वाचनालय, संगणक आणि विज्ञान प्रयोगशाळांसारखी नवीन संसाधने उपलब्ध करून दिली होती, ज्यासाठी स्थानिक प्रशासनाचे मोठे सहकार्य लाभले होते. या विस्तारामुळे शाळेची क्षमता वाढली आहे, ज्यामुळे, आता पूर्वीपेक्षा दुप्पट म्हणजेच 760 अतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रवेश देणे शक्य झाले आहे. सुसज्ज वर्गखोल्या, अद्ययावत शैक्षणिक साधने आणि सुधारित पायाभूत सुविधांमुळे ही शाळा विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरक्षित आणि अनुकूल वातावरण प्रदान करते.

कॅपिटालँड होप फाउंडेशन (इंडिया) चे संचालक आणि कॅपिटालँड इंडिया ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गौरी शंकर नागभूषणम म्हणाले, “महाराष्ट्रभरातील बिझनेस पार्क्स, डेटा सेंटर्स, लॉजिस्टिक्स आणि इंडस्ट्रियल पार्क्समध्ये कॅपिटालँडची उपस्थिती मोठी आहे, तसेच सातत्याने वाढत आहे. पुण्यातील आमच्या व्यवसायांच्या अगदी जवळ असलेल्या या शाळेमधून आम्ही कार्यरत असलेल्या स्थानिक समुदायासाठी महत्त्वपूर्ण कार्य करण्याप्रती आमची कटिबद्धता दिसून येते. केवळ पायाभूत सुविधाच नव्हे, तर कॅपिटालँडचे कर्मचारी स्वयंसेवक आणि सामाजिक भागीदारांच्या पाठिंब्यामुळे विद्यार्थ्यांसाठी अधिक समृद्ध शैक्षणिक वातावरण तयार होत आहे.“

कॅपिटालँड होप स्कूल प्रोग्रामच्या माध्यमातून सीएचएफ मुलांना सर्वसमावेशक आणि सहाय्यक शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देते, ज्यामुळे शैक्षणिक निकाल सुधारतात आणि मुलांच्या दीर्घकालीन सामाजिक प्रगतीचा व सक्षमतेचा पाया रचला जातो. भारतात हा उपक्रम सध्या बेंगळुरू, हैदराबाद, चेन्नई आणि पुणे येथील विविध शाळांमधील 3,000 हून अधिक विद्यार्थ्यांना पाठिंबा देत आहे.

# शहीद भगत सिंग हे मानवतावादी, समतावादी - किरणजीत सिंग

**पिंपरी येथे “शहीद भगत सिंग आणि आर्य समाज” विषयावर व्याख्यान**

पिंपरी, पुणे (दै. संध्या)

शहीद भगत सिंग हे मानवतावादी, समतावादी होते. बंदूक आणि तलवारीच्या जोरावर, ब्रिटिशांना भारतातून घालवून खरे स्वातंत्र्य मिळणार नाही, तर पूर्ण व्यवस्थाच बदलली पाहिजे. आत्ताचे स्वातंत्र्य हे भगत सिंग, सुखदेव, राजगुरू, चंद्रशेखर आझाद या क्रांतीकारकांच्या स्वप्नातील स्वातंत्र्य नाही. त्यांना जातवाद, धर्मवाद, प्रांतवाद, भ्रष्टाचार मान्य नव्हता. आता होणाऱ्या शेतकरी आत्महत्यांमुळे ते व्यथीत झाले असते. शहीद भगत सिंग यांच्या तीन पिढ्यांना बलिदानाचा इतिहास आहे. २७ सप्टेंबर १९०७ साली भगत सिंग यांचा जन्म झाला. बालपणी त्यांच्यावर गुरुगोविंद सिंग, आर्य समाज संस्थापक महर्षी दयानंद सरस्वती, छत्रपती शिवाजी महाराज, राणी लक्ष्मीबाई यांचा प्रभाव होता. आत्ताच्या पिढीने अशा महान क्रांतिकारकांचे चरित्र अभ्यासावे आणि महर्षी दयानंद सरस्वती यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त आर्य समाजाचे विचार पुढे न्यावे असे आवाहन भगत सिंग यांचे पुतणे किरणजीत सिंग यांनी पिंपरी येथे केले. शुक्रवारी (दि.२० मार्च) पुणे, पिंपरी कॅम्प येथील आर्य समाज भवन येथे "शहीद भगत सिंग आणि आर्य समाज" या विषयावर सिंग यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी पिंपरी आर्य समाज अध्यक्ष सुरेंद्र करमचंदानी, मंत्री हरेश तिलोकचंदानी, सचिव संजय वासवानी, समन्वयक उत्तम दंडीमे, डॉ. नयनकुमार आचार्य, नलिनी देशपांडे, राजाभाऊ गोलांडे, मारुती भापकर, अतुल आचार्य, सुहास पोफळे आदी उपस्थित होते.

शहीद भगत सिंग १२ वर्षाचे असताना ब्रिटिश सरकारने १३ एप्रिल १९१९ रोजी मार्शल लॉ लागू केला. त्यावेळी जालियनवाला बाग येथे जनरल डायर याने हजारो निरपराध नागरिकांवर बेछूट गोळीबार करून त्यांची हत्या केली. या घटनेनंतर भगत सिंग हे लाहोर येथून जालियनवाला बाग येथे आले आणि तेथील माती स्वतःच्या घरी घेऊन गेले. त्यानंतर त्यांनी भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याची शपथ घेतली. कानपूर येथे एका वृत्तपत्रात काम करीत असताना चंद्रशेखर आझाद आणि इतर क्रांतीकारकांशी त्यांचा संपर्क झाला. ब्रिटिशांनी नेमलेल्या सायमन कमिशनमध्ये एकही हिंदू प्रतिनिधी नाही. याच्या निषेधार्थ झालेल्या आंदोलनावर पोलिसांनी लाठीचार्ज केला. यामध्ये लाला लजपतराय सारख्या ज्येष्ठ क्रांतीकारकांचा बळी गेला. या घटनेमुळे भगतसिंग खूप व्यथीत झाले. बलिदानाशिवाय संघर्ष पूर्ण होणार नाही. एका भगत सिंगाला फाशी दिली, तरी लाखो भगत सिंग जन्म घेतील आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून देतील यावर त्यांचा विश्वास होता. भगत सिंग, सुखदेव, राजगुरू या क्रांतिकारकांना २४ मार्च १९३१ रोजी फाशी देण्याचे आणि त्यांच्या बरोबरच्या इतर १५ क्रांतीकारकांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. त्यामुळे देशभर तीव्र आंदोलन सुरू झाले. यानंतर ब्रिटिश सरकारने घाबरून भगत सिंग यांना एक दिवस अगोदरच फाशी दिली. फाशी देण्यापूर्वी भगत सिंग यांच्या आईला त्यांची भेट घेऊ दिली नाही आणि इतर कुटुंबीयांना अनेक अटी घातल्या. त्यावेळी पुण्यातून शहीद क्रांतीकारक राजगुरू यांच्या मातोश्री पार्वतीबाई लाहोर तुरुंगात या क्रांतीकारकांना भेटण्यासाठी आल्या होत्या. परंतु भगत सिंग यांच्या आईला भेटू दिले नाही याच्या निषेधार्थ राजगुरू यांच्या आई देखील राजगुरू यांना भेटल्या नाही.




देश प्रेमासाठी आणि एका मातेचा सन्मान राखण्यासाठी पार्वतीबाई या मातेने राजगुरू या स्वतःच्या मुलाची अंतिम भेट घेतली नाही. पार्वतीबाई या राष्ट्रप्रेमी मातेला नमन करण्यासाठी आणि त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मी पुणे मुक्कामी आलो आहे असे भावूक उद्गार किरणजीत सिंग यांनी काढले. प्रास्ताविक, स्वागत सुरेंद्र करमचंदानी, सूत्रसंचालन उत्तम दंडीमे आणि आभार अतुल आचार्य यांनी मानले.